
# हाशोध भारताचा

राजा मंगळवेढेकर

## सुवर्णयुगाचा अस्त

१



BVBK-0402273

ीन भारताच्या सुवर्णयुगाची ऐतिहासिक कहाणी.

वाचनालय शाखा
२२७३
२२।७।८८

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क. ..........
विषय

हा शोध भारताचा : ९



# सुवर्णयुगाचा अस्त

BVBK-0402273

गुप्त साम्राज्याच्या अखेरीने एक वैभवशाली कालखंड संपला

राजा मंगळवेढेकर

प्रकाशक
ना. गो. जोशी
अतुल बुक एजन्सी
प्रकाशन
३१७ नारायण पेठ,
दै ' प्रभातसमोर ' पुणे - ३०
फोनं - ४४९५४१.

© राजा मंगळवेढेकर
प्रकाशन दिनांक - १५ ऑगस्ट १९८८
( ) दुसरी आवृत्ती

मुद्रक - प्रमोद वि. बापट
स्मिता प्रिंटर्स
१०१९, सदाशिव पेठ,
नागनाथपाराजवळ,
पुणे - ३०.

मूल्य - १००/- रूपये
१० पुस्तकांचा संच

भारत !

पाच सहस्र वर्षांचा स्फूर्तीदायक इतिहास
अभिमानाने सांगणारा हा पृथ्वीच्या पाठीवरला
प्राचीन, विशाल देश !
अनेक मानवसमूह या भूमीवर आले, वसले, नांदले.
अनेक राज्ये-साम्राज्ये उदयाला आली नि मावळली.
विविध संस्कृती, धर्म, पंथ ...
विविध साहित्य, संगीत, शिल्प....
विविध शास्त्र, विज्ञान, कला ...
किती तरी गोष्टींतून भारताच्या
अस्मितेची जडण-घडण झाली.
एक विदग्ध, सहिष्णू, विजिगीषू
व नित्यनूतन अशी संस्कृतीही
आकारास आली.
अर्वाचीन भारत
अशा गौरवसंपन्न प्राचीन भारताच्या
मजबूत खांद्यावरच उभा आहे.
आणि त्याच प्राचीन भारताच्या
सांस्कृतिक धडपडीचा हा
एक विनम्र शोध !

अ नु क्र म


| | |
|---|---|
| कुमारगुप्त | ५ |
| स्कन्धगुप्त | १६ |
| सुवर्णयुगाच्या अस्तकाली | ३० |
| गुप्त साम्राज्य | ३७ |
| सुवर्णकालाचे दर्शन : १ | ४६ |
| सुवर्णकालाचे दर्शन : २ | ५३ |
| उत्तरगुप्त | ६० |

म. ग्रं. सं. ठाणे. ग्रंथालय
२२६३ २२१९
विषय

## कुमारगुप्त

" चारही समुद्र जिच्या कटीची मेखला बनलेली आहेत, समेरु आणि कैलास जिचे पयोधर असल्यासारखे आहेत, आणि सुरम्य पुष्पवाटिकांमधून फुललेल्या फुलांसारखे जिचे हास्य आहे अशा पृथ्वीवर त्यावेळी कुमारगुप्त राजा राज्य करीत होता."

मंदसोर येथील प्रशस्तीलेखात कुमारगुप्त ह्या राजांविषयी वरीलप्रमाणे एका श्लोकात वर्णन केलेले आहे. चंद्रगुप्त विक्रमादित्यानंतर त्याचा पुत्र पहिला कुमारगुप्त हा राजा झाला. इ. स. ४१५ ते ४५५ अशी चाळीस वर्षे या कुमारगुप्ताने राज्य केले. याच्या कारकीर्दीसंबंधी अनेक ठिकाणचे अभिलेख आणि मुद्रा उपलब्ध झालेल्या आहेत. त्यावरून त्याच्या राज्यकालाविषयी आणि कारभाराविषयी बरीच निश्चित माहिती मिळू शकते. कोणाही गुप्त वंशातील राजापेक्षा कुमारगुप्ताविषयीचे अभिलेख अधिक प्रमाणात उपलब्ध झालेले आहेत. मध्यप्रदेशातील मंदसोर येथेही मालव

संवत् ४९३ मधील एक शिलालेख सापडला आहे. त्यावर वत्सभट्टी नावाच्या कवीने रचलेले कुमारगुप्ताच्या प्रशस्तीचे श्लोक खोदलेले आहेत. हा कवी मोठा मर्मज्ञ होता. याच्या नजरेतून कुमारगुप्तकालीन भारताचे देदिप्यमान चित्र आपल्यासमोर उभे राहाते.

बिलसद येथे सापडलेल्या लेखात कुमारगुप्त हा महाराजाधिराज चंद्रगुप्त आणि ध्रुवदेवी यांचा पुत्र होता असे म्हटले आहे. तत्कालीन मुद्रांवर श्रीमहेन्द्र, अश्वमेधमहेन्द्र, सिंहमहेन्द्र, श्रीमहेन्द्रसिंह, महेन्द्रकुमार, महेन्द्रकल्प, सिंहविक्रम, व्याघ्रबल–पराक्रम, श्रीप्रताप आणि महेन्द्रादित्य अशा कुमारगुप्ताच्या विविध गौरव पदव्या रेखलेल्या आढळतात.

वैशाली येथील मुद्रालेखावरून अशी माहिती मिळते की, गोविंदगुप्त नावाचा एक धाकटा भाऊ कुमारगुप्ताला होता. तो कुमारगुप्ताच्या काळातच उत्तर बिहार प्रदेशावर राज्यपाल होता. या लेखानुसार तोही दुसरा चंद्रगुप्त आणि त्याची पत्नी ध्रुवदेवी यांचा पुत्र होता. भितरी येथील मुद्रालेखात त्याच्या मुख्य राणीचे नाव अनंतदेवी असे दिलेले असून तिच्यापासून त्याला कुरुगुप्त नावाचा पुत्र झाला होता. याच्या मोठ्या मुलाचे नाव स्कंदगुप्त असे होते. काही विद्वानांचे असे मत आहे की, कुमारगुप्ताच्या देवकी नावाच्या राणीच्या पोटी याचा जन्म झालेला होता. भितरी येथील लेखात याचा नामोल्लेख आढळतो. याला घटोत्कचगुप्त नावाचाही एक पुत्र होता. याचा उल्लेख तुमैना येथील लेखात आढळतो. हा पूर्व माळव्याचा राज्यपाल होता.

मंदसोर प्रशस्तीचा लेखक वत्सभट्टी हा दुसऱ्या कुमारगुप्ताच्या काळामध्ये इ. स. ४७२ मध्ये होऊन गेला. याने रचलेला एखादा ग्रंथ उपलब्ध नाही. परंतु हा एक उच्च दर्जाचा कवी होता असे त्याच्या या प्रशस्तीलेखावरून लक्षात येते. त्याच्या प्रतिभेची साक्ष मिळते. या प्रशस्तीलेखाचे वैशिष्ट्य असे आहे की, हा राजकीय लेख नसून वैयक्तिक स्वरूपाचा

आहे. दुसऱ्या कुमारगुप्ताच्या काळात जरी हा खोदलेला असला तरी यावरून पहिल्या कुमारगुप्ताच्या कारकीर्दीतील पुष्कळशा घटनांची माहिती मिळू शकते. याचे महत्त्व ऐतिहासिकदृष्ट्या जसे आहे तसेच साहित्यिकदृष्टीनेही आहे. या लेखात आर्या, वसंततिलका, शार्दुल-विक्रीडित, उपेन्द्रवज्रा, द्रुतविलंबित, इंद्रवज्रा आणि मालिनी इत्यादी संस्कृत छंदांचा उत्कृष्टपणे उपयोग केलेला आहे. मालव प्रदेशात सिवना नदीच्या किनारी मंदसोर हे गाव आहे. याला आज दसोर असेही म्हणतात. याचे प्राचीन नाव दशपूर असे होते. हा लेख प्रकाशात आणण्याचे श्रेय कनिंग-हॅम आणि फ्लीट या संशोधकांना देण्यात येते.

या प्रशस्तीमधील पहिल्या तीन श्लोकांत सूर्याची स्तुती गायिलेली आहे. त्यानंतर गुजरातच्या रमणीय वर्णनाने याचा प्रारंभ होतो. हा प्रदेश पुष्पभारांनी वाकलेल्या वृक्षांनी, मंदिरांनी, सभागृहे आणि विहार इत्यादींनी सुशोभित असा होता. येथूनच प्रथितयश असे शिल्पकार माळव्यातील दशपूर नगरात आले. प्रथमतः ते एकटेच परंतु नंतर ते परिवारासहित आले. तेथील सरोवर अत्यंत चित्ताकर्षक होते. त्याच्या किनारी उगवलेल्या वृक्षांवरील फुले जेव्हा खाली पडत असत त्यावेळी त्या सरोवरातील पाण्याला एक विशेष कांती चढत असे. त्या सरोवराच्या पाण्यामध्ये कमळे फुललेली असत. आणि हंस, कारण्डव इत्यादी पक्षी निरंतर तरंगताना दिसत असत. पुष्पवाटिकांची छटा तर आगळीच होती. भ्रमरांचा सुमधुर गुंजारव आणि गजगामिनी रमणींची मंथर आणि भव्य चाल यामुळे तेथील वातावरण धुंद बनलेले असे. नगरीतील वास्तु अत्यंत भव्य अशा होत्या. सुनिर्मित अशी भवने पाहताच असे वाटे की, ती जणू भूमीचे कवच फाडून एकदमच वर आलेली आहेत. आणखी दोन नद्यांनी हे नगर वेढलेले होते. जणू काही प्रीती आणि रती नावाच्या दोन भार्या साक्षात कामदेवालाच गूढरूपाने आलिंगन देत आहेत.

ज्याप्रमाणे विष्णूचे वक्षस्थल कौस्तुभमण्याने सुशोभित आहे त्याप्रमाणे या श्रेष्ठ सूर्यमंदिरामुळे हे संपूर्ण नगर अलंकृत झालेले आहे. प्रशस्तीकार वत्सभट्टी शेवटी अशी कामना व्यक्त करीत आहे की, जोवर भगवान विष्णुच्या गळ्यात कमलपुष्पांचा हार सुशोभित आहे अथवा शिवाच्या मस्तकावर जटा आणि भालावर चंद्रकला विराजमान आहे तोपर्यंत हे उदार सूर्यमंदिर स्वस्थानी निरंतर उभे राहील.

कुमारगुप्ताच्या काळातील आणखीही बरेच शिलालेख उत्तर भारतात उपलब्ध झालेले आहेत. काही शिलालेखांत कुमारगुप्ताविषयीची माहिती आहे. काही अन्य तऱ्हेची माहितीही नमूद केली आहे. त्यावरून तत्कालीन समाजस्थितीची कल्पना येते. उत्तर प्रदेशातील बिलसद नावाच्या गावात असलेल्या एका शिलालेखात संस्कृतमध्ये गद्य-पद्य-मिश्रित अशा शैलीत कुमारगुप्ताच्या राज्यकालातील गुप्त संवत् ९६ हे ‘समृद्धशाली वर्ष’—अभिवर्धमान विजयराज्य संवत्सर—असा उल्लेख केलेला आहे. लेखाच्या पहिल्या सहा ओळींत गुप्त वंशावलीचे वर्णन दिलेले आहे. त्यात ध्रुवशर्मा नावाच्या ब्राह्मणाचाही उल्लेख आलेला आहे. या ब्राह्मणाविषयी त्यात अशी माहिती दिलेली आहे की, हा ब्राह्मण कलि-कालातील युगाचाराला अनुसरून धर्ममार्गाने जाणारा होता. याने अध्यात्मिक लाभाच्या हेतूने स्वामीमहासेनाचे म्हणजे कार्तिकेयाचे मंदिर बांधले होते. त्याचे महाद्वार स्फटिक मण्यांनी जडवलेले होते. या महाद्वाराच्या पुढे त्याने टप्प्याटप्प्याची जिन्यासारखी काही निवासस्थाने बांधलेली होती. ती शिल्पसौंदर्याने नटलेली होती. मुनी लोक या निवासस्थानात या ठिकाणी राहात असत. ध्रुवशर्मा ब्राह्मणाने तेथे एक धर्मशाळाही बांधलेली होती. तेथेही गुणीजन येऊन रहात असत. आपल्या जीवनातील संचित विभूतीच्या द्वारा त्यानें या गोष्टी केल्या होत्या. याच ध्रुवशर्मा ब्राह्मणाने आपली पुण्यकृत्ये चिरस्मरणीय बनण्याच्या

हेतूने हा बिलसद येथील स्तंभलेखही कोरून ठेवलेला होता. त्याच्या या कृतीमुळे सर्व लोकांच्या आदराला आणि श्रद्धेला तो पात्र झालेला होता. या स्तंभलेखात ध्रुवशर्मा हा विमलबुद्धीचा होता असे म्हटले आहे. आणि त्याला दीर्घ आयुष्य लाभावे अशी प्रार्थना केलेली आहे. गढवा, मनकुँवर, करमदाण्डा, मथुरा, सांची, तुमई, उदयगिरी, धानाईदह इत्यादी ठिकाणीही स्तंभलेख व शिलालेख सापडलेले आहेत. बहुतेक सर्व लेखांमध्ये वैयक्तिक धर्मपरायण व्यक्तींचा उल्लेख केलेला आहे. त्यांनी बांधलेली मंदिरे, स्थापन केलेल्या मूर्ती त्याचप्रमाणे त्यांनी केलेले भूमिदान व द्रव्यदान इत्यादी गोष्टींचीच त्यातून माहिती मिळते. राजकीय घटनांची माहिती त्यांत नमूद केलेली नाही. त्यामुळे कुमारगुप्तकालीन उपलब्ध लेखांवरून तत्कालिन धार्मिक, आर्थिक आणि सांस्कृतिक इतिहास कळू शकतो.

बिलसद येथील स्तंभलेख हा कुमारगुप्ताच्या कारकीर्दीतील पहिला लेख आहे. त्यावर गुप्तसंवत ९६ मध्ये– इ. स. ४१५–अशी नोंद आहे. त्यावरून त्या सुमारास कुमारगुप्ताला राज्याभिषेक झाला असावा. एरण येथील समुद्रगुप्ताच्या अभिलेखात त्याच्या पौत्रांचा उल्लेख केलेला आहे. त्यावरून कुमारगुप्ताचा जन्म समुद्रगुप्ताच्या काळीच झालेला असावा. याच्या जीवनातील इ. स. ३७५ ते ४१५ अशी ४० वर्षे त्याचा पिता चंद्रगुप्त विक्रमादित्य याच्या कारकीर्दीतच व्यतीत झालेली होती. त्यामुळे राज्याभिषेक झाला. त्यावेळी कुमारगुप्त हा चाळीशीतील प्रौढ राजा होता. त्याच्या मुद्रांवर अंतीम तिथी गुप्त संवत् १३६ म्हणजेच इ. स. ४५५ दिलेली आहे. तसेच त्याचा पुत्र स्कंदगुप्त याच्या जुनागढ येथील अभिलेखात ह्याच तिथीचा उल्लेख केलेला आहे. त्यावरून इ. स. ४५५ मध्ये कुमारगुप्ताची राजवट समाप्त झाली होती असे दिसते.

कुमारगुप्ताच्या प्रारंभीच्या राज्यकालामध्ये गुप्त साम्राज्यावर कसलेही

बाह्य आक्रमण झालेले नव्हते. तो शांतीपूर्वक राज्य करीत होता. धार्मिक आणि सार्वजनिक कृत्यांमध्ये हा भाग घेत होता. आणि विविध प्रकारच्या सुखसोयी घडवून आणीत होता.

भितरी येथील अभिलेखावरून असे लक्षात येते की, कुमारगुप्ताच्या राजवटीतील अखेरची वर्षे अशांततेची गेली होती. याच्या कारकीर्दीच्या उत्तरार्धात गुप्त साम्राज्यावर पुष्यमित्राने आक्रमण केले होते. पुष्यमित्राचे आक्रमण अतिशय मोठे होते आणि ते परतवून लावण्यामध्ये वृद्ध कुमार-गुप्ताला अत्यंत प्रयास पडले होते म्हणून ह्या आक्रमणाला प्रतिकार करण्याची जबाबदारी कुमारगुप्ताने आपला पुत्र स्कंदगुप्त याच्यावर सोपवलेली होती. पुष्यमित्राचे सैन्यबळ आणि इतर युद्धसाधने समृद्ध होती परंतु अशा बलशाली आणि भयंकर आक्रमकांनाही परतवून लावून स्कंदगुप्ताने आपल्या अंगचे शौर्यगुण प्रकट केले होते.

या पुष्यमित्राला कोणी युद्धमित्र असेही म्हटले आहे. परंतु विष्णु-पुराणामध्ये याचा पुष्यमित्र या नावानेच उल्लेख केलेला आढळतो. जैन कल्पसूत्रामध्ये पुष्यमित्र कुलाचाच उल्लेख आहे. पुराणांच्यानुसार पुष्यमित्र हा नर्मदा नदीच्या मुखाजवळील मेकल नावाच्या प्रदेशात राज्य करीत होता. पुष्यमित्र नावाची एक जमात होती असे काही विद्वानांचे मत असून महिष्मती नगरीपासून मेकलपर्यंत त्यांचे राज्य होते असे त्याचे म्हणणे आहे. वाकाटकांच्या लेखात आणि बाणभट्टाच्या हर्षचरितातही यांचा उल्लेख आढळतो.

'मंजुश्रीमूलकल्प' नावाच्या ग्रंथानुसार महेंद्र नावाच्या सम्राटावर यवन, पल्लव आणि शक जातीच्या लोकांनी आक्रमण केलेले होते, त्यांनी गंगा आणि गांधारच्या उत्तरेकडील प्रदेश जिंकून घेतलेला आहे. कुमारगुप्ताला महेंद्रादित्य अशी एक पदवी होती. त्यावरून ही आक्रमणे त्याच्याच काळी झाली असावीत असे अनुमान आहे.

कुमारगुप्ताच्या कारकीर्दीच्या अखेरच्या काळातच वाकाटकांनीही उठाव केलेला होता. वाकाटक राजा नरेन्द्रसेन याच्या अभिलेखावरून तो कोसल, मेकल आणि मालव या प्रदेशाचा अधिपती होता असे दिसते. दुसऱ्या चंद्रगुप्ताच्या काळापासून संपूर्ण मालव प्रदेशावर गुप्तांची राजवट सुरू होती. नरेन्द्रसेन हा इ. स. ४४० ते ४६० या काळात राज्य करीत होता. यावेळीच पुष्यमित्राचे आक्रमण परतवून लावण्यात स्कंदगुप्त गुंतलेला होता आणि याच संधीचा फायदा घेऊन वृद्ध झालेल्या कुमारगुप्ताच्या माळव्यातील राज्याविरुद्ध नरेन्द्रसेनाने उठाव केलेला होता. परंतु स्कंदगुप्ताने पुष्यमित्राचा पराभव केल्यानंतर वाकाटकांचाही हा उठाव मोडून काढलेला होता. त्यानंतर मालव प्रदेशात व आसपासही वाकटकांचे अस्तित्व उरलेले नव्हते. स्कंदगुप्ताच्या कारकीर्दीमध्ये माळवा आणि गुजरात या भागांवर गुप्त साम्राज्यच नांदत होते.

कुमारगुप्ताने आपले आजोबा समुद्रगुप्त यांच्याप्रमाणेच दक्षिणापथावर आक्रमण केले होते असे अनुमान त्याच्या उपलब्ध झालेल्या मुद्रांवरून काढण्यात येते. कुमारगुप्ताच्या ‘ व्याघ्रहनन ’ प्रतिमेच्या मुद्रेवर ‘ व्याघ्र-बल-पराक्रम ’ अशी उपाधि रेखलेली आहे. यावरून कुमारगुप्ताने नर्मदा नदी ओलांडून व्याघ्रगुप्त अरण्याच्या क्षेत्रावर आपले आधिपत्य स्थापन केले होते असे दिसते.

कुमारगुप्तानेदेखील अश्वमेध यज्ञ केलेला होता. त्याच्या लेखांमध्ये अशा यज्ञाचा उल्लेख आढळत नसला तरी त्या वेळच्या काही मुद्रांवरून मात्र हे कळून येते. त्याच्या काळातील काही सुवर्णमुद्रांना अश्वमेध प्रकारच्या मुद्रा अशी संज्ञा दिली जाते. या प्रकारच्या मुद्रांवर पुढील भागी सुसज्जित असा यज्ञाचा घोडा यूपाच्या समोर दाखवलेला असतो. त्यावर सम्राटाचे नावही रेखलेले असते. पाठीमागच्या भागावर ‘ अश्वमेध महेंद्र: ’ अशी याची उपाधी आहे. कुमारगुप्ताने आसाम–विजयाच्या निमित्ताने अश्वमेध

दशपूर नगरात आलेले ते कलावंत आपल्या पैतृक व्यवसायाव्यतिरिक्त अन्य विविध कलांमध्येदेखील प्रवीण होते. त्यांतील काही ज्योतिषशास्त्राचे जाणकार होते, काही मधुर हितकारी भाषण करण्यामध्ये वाकबगार होते, काही धनुर्विद्येतील मर्मज्ञ होते, काही कथा-कहाणी निवेदन करण्यामध्ये प्रवीण होते आणि काही युद्धकलेतीलही चांगले जाणकार होते. त्यावेळी कुमारगुप्त राजा राज्य करीत होता. त्याच्या अधिपत्याखालील विश्ववर्मा नावाचा माळव्याचा राजा हा दयाळू, अनाथांना कल्पद्रुमासारखा वाटणारा, असहाय्य प्राण्यांना अभय देणारा, रणांगणामध्ये अर्जुनासारखा पराक्रमी, भयभीत झालेल्यांना अभय देणाऱ्या बंधूसारखा होता. त्याचा पुत्र बन्धुवर्मा नावाचा होता. तो विनयाने नम्र, कमनीय, शृंगाराची साक्षात मूर्ती, आणि गर्वरहित असा होता. ज्यावेळी शत्रूंच्या सुंदर स्त्रियांना त्याचे स्मरण होई त्यावेळी त्यांच्या वक्षस्थलात कंपन होत असे अशी वर्णने या लेखात केलेली आहेत. शिल्पकलेत प्रवीण असणाऱ्या या कलावंतांनी विलक्षण भव्य असे सूर्यमंदिर निर्माण केले होते. या प्रशस्तीलेखानुसार हे मंदिर मालव संवत् ४९३ म्हणजे इ. स. ४३६ मध्ये बांधले होते. हे मंदिर रुंद आणि उंच अशा शिखराने युक्त होते. ते चंद्राच्या रश्मीधाराप्रमाणे धवल आणि पर्वताच्या शिखराची आठवण करून देणारे होते. कालांतराने या मंदिराचा काही भाग नष्ट होऊन गेला. त्यानंतर मंदिराचा जीर्णोद्धार करण्यात आला. धवल चंद्रामुळे जशी नभोमंडळाला शोभा येते तशीच शोभा या मंदिरामुळे या नगरीला प्राप्त होते. या प्रशस्तीलेखात या मंदिराचा जीर्णोद्धार इ. स. ४७२ मध्ये केला असा उल्लेख आहे.

यावेळी दुसरा कुमारगुप्त राज्य करीत होता. दशपुरातील नागरिकांच्या सामाजिक आणि धार्मिक जीवनामध्ये या मंदिराला फार महत्त्वाचे स्थान होते. या लेखात प्रशस्तीकाराने मोठ्या कलात्मक ढंगाने म्हटले आहे की,

यज्ञ केला होता.

गुप्त वंशातील अभिलेखांमध्ये याला 'गुप्तकुल व्योमशशी' म्हणजे गुप्तवंशरूपी आकाशातील चंद्रमा असे म्हटलेले आहे. कुमारगुप्ताचे साम्राज्य पश्चिमेकडे गुजरात–काठेवाडपर्यंत पसरलेले होते. पूर्वेकडे त्याच्या साम्राज्याची सीमा बंगालपर्यंत पोचलेली होती. त्या भागात त्याचे काही लेख उपलब्ध झालेले आहेत. गुजराथ आणि बंगाल याच्यामधल्या प्रदेशातही त्याचे अनेक लेख आणि नाणी सापडलेली आहेत. माळवा, गंगेचे खोरे हा प्रदेश त्याच्या स्वामित्वाखालीच होता.

कुमारगुप्ताच्या काळातील लेखांमध्ये त्याच्या काही सामन्तांची आणि पदाधिकाऱ्यांची नावे अशा प्रकारे आढळतात : घटोत्कचगुप्त–हा गुप्तवंशातील राजकुमार होता. एरणपासून उत्तरे-पश्चिमेकडील ५० मैलांच्या तुम्बवन प्रदेशावर राज्यकारभार पाहात होता. तुम्बवन हे पूर्व माळव्यामध्ये होते.

बन्धुवर्मा—हा एक सामन्त–सरदार होता आणि तो मन्दसोर पश्चिम माळव्यावर राज्यकारभार करीत होता.

गोविन्दगुप्त -हा कुमारगुप्ताचा धाकटा भाऊ होता. वैशाली येथील मुद्रेवर याचे नाव आढळते. तो दुसऱ्या चंद्रगुप्ताच्या काळात तेथे राज्यपाल होता. कुमारगुप्ताच्या काळात तो पश्चिम माळव्याचा राज्यपाल झाला होता.

चिरातदत्त —हा बहुधा पुण्ड्रवर्धनभुक्ती म्हणजे उत्तर बंगालचा राज्यपाल होता.

पृथिवीषेण –करमदाण्डा येथील लेखात याचा उल्लेख आहे. तो गुप्ताचा मंत्री, कुमारामात्य होता. नंतर तो त्याचा महाबलाधिकृत बनला.

कुमारगुप्ताने आपल्या वंशातील परंपरागत धार्मिक सहिष्णुतेची नीति

अवलंबिली होती. त्याच्या काळात विष्णू, शिव, शक्ती, कार्तिकेय, सूर्य, बुद्ध आणि जिन् यांची उपासना लोक करीत असत. कुमारगुप्त हा स्वतः वैष्णव होता. गुप्तकालीन लेखांमध्ये त्याला 'परमभागवत' असे म्हटलेले आहे. याच्या काळात अनेक ठिकाणी शिव, विष्णू, सूर्य आदींची मंदिरे उभारली गेली होती. तसेच मथुरेत जैन मूर्तींचीही स्थापना झाली होती.

कुमारगुप्ताच्या काळी राज्यातील प्रजाजनांची आर्थिक स्थिती संतोषजनक होती. विविध प्रकारच्या व्यावसायिक लोकांच्या संघटना अस्तित्वात होत्या. त्यांना 'श्रेणी' असे म्हणत असत. या काळातील सोन्याच्या, चांदीच्या आणि तांब्याच्या मुद्रा भरपूर प्रमाणावर उपलब्ध झालेल्या आहेत, त्यावरूनही त्या काळातील समृद्धीची कल्पना येते.

कुमारगुप्ताच्या काळी अनेक तऱ्हेची सार्वजनिक कामे झालेली होती. सांची येथील लेखांमध्ये हरीस्वामिनी नावाच्या एका महिलेने काकनाबाट येथील विहाराला दान दिले होते. त्याच्या व्याजातून तिथे राहाणाऱ्या भिक्षूंच्या भोजनाचा खर्च चालत असे असा उल्लेख आहे. त्याचप्रमाणे वराहस्वामी नावाच्या ब्राह्मणाला भूमिदान दिल्याचा उल्लेख धानाईदह येथील ताम्रलेखात आढळतो. अशा प्रकारे कोठे मंदिराला भूमिदान दिल्याचा तर कोठे मंदिरातील पूजेसाठी धूप, दीप, फुले इत्यादी पूजेसाठी दान दिल्याचे उल्लेख आढळतात.

कुमारगुप्ताच्या काळातील लेखांवरून तत्कालीन स्थानिक स्वरूपाच्या शासनपद्धतीबद्दलही माहिती मिळते. 'विषयपती' म्हणजे जिल्हाधिकारी याच्या सहाय्यासाठी एक स्थानीय समिती असे. या समितीची बैठक विषयपतीच्या कार्यालयातच भरत असे. त्याच्या कार्यालयाला 'अधिष्ठानाधिकरण' असे म्हणत असत. या समितीचे चार सदस्य होते.

(१) नगरश्रेष्ठी —हा जिल्ह्यातील प्रमुख अशा नगरातील मोठा

धनवान गृहस्थ असे. दामोदरपूर येथील लेखात धृतिपाल नावाच्या नगर श्रेष्ठीचा उल्लेख आहे.

( २ ) सार्थवाह –हा व्यावसायिक समितीचा अध्यक्ष असे. वरील लेखात बन्धुमित्र नावाच्या सार्थवाहचा उल्लेख आलेला आहे.

( ३ ) प्रथमकुलिक– हा कारागिरांचा प्रतिनिधी असे. वरील लेखात धृतिमित्र नावाच्या प्रथमकुलिकाचा उल्लेख आलेला आहे.

( ४ ) प्रथमकायस्थ– हा लेखक संघाचा प्रतिनिधी असे.

अशा प्रकारची एक जिल्हा समिती कोटीवर्ष नावाच्या एका जिल्ह्यातील वेत्रवर्मा नावाच्या एका मुख्य कर्मचाऱ्याला मदत करीत होती.

कुमारगुप्ताच्या काळात जमिनीची खरेदी-विक्री एका निर्धारित मूल्यांनुसारच होत असे. शेतीची जमीन आणि वास्तू बांधण्याची जमीन यांची किंमत वेगवेगळी असे. सार्वजनिक हिताच्या असलेल्या जमिनीसंबंधी काही निश्चित नियम केलेले होते. भूमी–विक्रीचे कार्य विशिष्ट व्यक्तींच्या पुढेच होत असे. त्यांच्या समक्ष लेखी व्यवहार पूर्ण होत असत. अशा अधिकाऱ्यांना ‘ महत्तर ’ म्हणजे प्रतिष्ठित लोक, ‘ अष्टकुलाधिकरण ’ म्हणजे गावातील आठ कुलांची व्यवस्था पाहणारा कर्मचारी आणि ‘ ग्रामिक ’ म्हणजे गावचा प्रमुख, असे म्हणत असत.

कुमारगुप्ताची बरीचशी नाणी अथवा मुद्रा या गुप्त वंशातील पूर्वीच्या राजांच्या परंपरेतीलच होत्या. मात्र खड्गधारी, गजारोही, गजारूढ-सिंहनिहन्ता, गेंडानिहन्ता, कार्तिकेय इत्यादी मुद्रा नवीन तऱ्हेच्या होत्या.

कुमारगुप्ताची कारकीर्द ही तशी शांततेची व समृद्धीची होती. त्याने आपले साम्राज्य व्यवस्थितपणे सांभाळले. त्याला बुद्धिमान, शक्तिसंपन्न, यशस्वी, पृथ्वीचा स्वामी, आणि लक्ष्मीवान अशा गौरवाच्या पदव्या होत्या. त्यावरूनही त्याचे महत्त्व लक्षात येते.

2203 22/7/01



# स्कंधगुप्त

पहिल्या कुमारगुप्तानंतर त्याचा पुत्र स्कन्धगुप्त हा राज्यावर आला. परन्तु पहिल्या कुमारगुप्ताच्या मृत्यूनंतर राज्याधिकार हातात घेण्यापूर्वी स्कन्धगुप्ताला गृहकलहाला तोंड द्यावे लागले होते आणि त्यातूनच त्याला सिंहासनाची प्राप्ती झाली होती असे काही विद्वानांचे मत आहे. काहींच्या मते तर या गृहकलहाच्या मधूनच गुप्त साम्राज्य दोन शाखांमध्ये विभक्त झाले. त्यातील प्रमुख शाखेमध्ये स्कन्धगुप्त आणि त्याचे पाठीमागून आलेले दुसरा कुमारगुप्त इत्यादी राजांचा उल्लेख केला जातो. दुसऱ्या शाखेमध्ये कुरुगुप्त, नरसिंहगुप्त आणि तिसरा कुमारगुप्त इत्यादींचा उल्लेख करण्यात येतो. हे दुसऱ्या शाखेतील राजे केवळ दक्षिण बिहारमधील छोट्या भागावरच राज्य करीत होते. परंतु पाटलीपुत्र येथे राजधानी असताना अशा प्रकारे मगधाचे विभाजन केवळ अशक्य होते. आणि स्कन्धगुप्त या शूर आणि पराक्रमी सम्राटाने आपल्या वंशजाचे

साम्राज्य अखंड ठेवले होते.

स्कन्धगुप्त आणि कुरुगुप्त हे एकच होते असे मत हार्नले नावाच्या इतिहासतज्ञाने नोंदविलेले आहे. 'मंजुश्रीमूककल्प' या ग्रंथामध्ये स्कन्धगुप्ताला बरीच नावे होती असे म्हटलेले आहे. त्याकाळी अशी विविध नावे राजांना असतही. दुसऱ्या चंद्रगुप्ताला सांची येथील लेखांमध्ये 'देवराज' असे म्हटले आहे, तर वाकाटकांच्या लेखांमध्ये त्याला 'देवगुप्त' म्हणून उल्लेखिलेले आहे. अशाच प्रकारे स्कन्धगुप्तालाही 'कुरुगुप्त' हे आणखी एखादे नाव असण्याची शक्यता आहे.

बिहार येथील स्तंभेलखामध्ये स्कन्धगुप्ताला कुमारगुप्ताचा वारस म्हटलेले आहे.

स्कन्धगुप्ताने राज्यावर येण्यापूर्वीच युवराज असताना पुष्यमित्र जमातीच्या आक्रमणाला मोठ्या पराक्रमाने परतवून लावले होते. याने आपल्या कारकीर्दीतही असाच महान पराक्रम गाजविला होता. याच्यासंबंधी भितरी येथील स्तंभलेखात म्हटले आहे की, 'ज्या काळात हा राजा राज्य करीत होता, त्या काळात त्याच्या प्रजेमध्ये कोणीही व्यक्ती अधर्मी, दुःखी, दरिद्री, संकटग्रस्त, लोभी, दण्डनीय अथवा भृषपीडित म्हणजे अत्यंत गांजलेली अशी नव्हती.'

गुप्तवंशामध्ये जे अद्वितीय वीर होऊन गेले त्यांत स्कंधगुप्ताचे नाव गौरवाने घेतले जाते. समुद्रगुप्ताला 'सर्वराज्योच्छेता' असे म्हटले जाई, चंद्रगुप्त विक्रमादित्य 'शकारी' होता, तर स्कंधगुप्त हा 'हूण-विजेता' म्हणून विख्यात झाला होता.

स्कंधगुप्ताच्या राजवटीसंबंधी, व्यक्तित्वासंबंधी तत्कालीन अभिलेखांमधून माहिती मिळते. या दृष्टीने जुनागढ येथील शिलालेख महत्त्वपूर्ण आहे. हा लेख संस्कृत पद्यात लिहिलेला असून विविध छंदांचा उपयोग केलेला आहे. विष्णूच्या स्तुतीने या लेखाचा प्रारंभ होतो. त्यात स्कंध-

गुप्ताने हूणांवर मिळविलेल्या विजयाची चर्चा आलेली आहे.

कहौ येथील स्तम्भलेखांमध्ये स्कन्धगुप्ताच्या राजवटीला ‘ शान्तवर्ष ’ असे म्हटलेले आहे. हूण विजयानंतरचा हा लेख असल्यामुळे प्रारंभीच्या काळातील युद्धाची धामधूम संपल्यानंतर स्कन्धगुप्ताच्या साम्राज्यात शांती आणि स्थैर्य नांदू लागल्याचे यावरून लक्षात येते.

स्कन्धगुप्ताच्या कारकीर्दीच्या प्रारंभीच हूणांनी स्वारी केली होती. त्या काळात हूणांनी सगळीकडेच धुमाकूळ माजविलेला होता. ‘ सहा सोनेरी पाने ’ या ग्रंथात स्वातंत्र्यवीर सावरकरांनी हूणांच्यासंबंधी लिहिले आहे की, “ ह्यांनीच शककुशाणांच्या झाडून साऱ्या लोकांना त्यांच्या प्रदेशातून हुसकून देऊन ते प्रदेशाचे प्रदेश व्यापून टाकले होते. पण आता त्या शककुशाणांहूनही अधिक भयंकर अशा हूणांच्या प्रलयाने सारा आशियाच नव्हे तर सारा युरोपही हादरवून त्यावेळच्या ज्ञात जगातील जी जी स्थायी सुसंस्कृत नि संघटित अशी राज्ये होती ती सर्वच्या सर्व चीनपासून ते रोमपर्यंत चळचळा कापावयास लावली. त्यांच्या संख्याबळाला अंतच नव्हता. त्यांची धाड ह्या व त्या प्रदेशांपुरती नव्हती तर ती त्या काळच्या साऱ्या ज्ञात जगावर पडलेली होती !

“ त्यांची सैन्ये जेव्हा बाहेर पडत तेव्हा सहस्रावधी स्त्रीपुरुषांसुद्धा घोड्यावर स्वार होऊन हाती भाले नि तलवारी परजीत; जी समोर दिसतील त्या त्या नगरांना, ग्रामांना आगी लावीत, मुलांमाणसांसुद्धा सगळ्यांची शिरकाणे करीत, दिवसाचे नव्हे तर रात्रीबेरात्रीसुद्धां हिंस्र-श्वापदांच्या थव्याप्रमाणे मोठमोठ्या कर्कश किंकाळ्या नि डरकाळ्या फोडीत चळचळ कापणाऱ्या शत्रूप्रदेशातूनच सारखी धावत सुटत. जेथे जेथे लढाई तेथे तेथे लढाई संपताच शिरकाण केलेल्या स्त्रीपुरुषांच्या डोक्यांच्या कवट्या काढून त्यांच्या वाट्या करून त्या वाट्यांतून ते मद्य पीत, नित्याचे जयोत्सव साजरे करीत.

" हूणांचा मूळचा प्रदेश चीनच्या साम्राज्याला लागून असल्यामुळे त्यांच्या अशा भयंकर उपद्रवाने चीनचे प्रांतचे प्रांत उजाड झाले. वर्षानुवर्षे हूणांच्या टोळधाडींना निवारता निवारता टेकीस आल्यामुळे चीनच्या साऱ्या देशाभोवतीच हूणांच्या टोळधाडीपासून संरक्षील अशी प्रचंड तटबंदी बांधण्याची योजना चीनच्या सम्राटाचे मनात आली,— तीच होय आजची ' चीनची भिंत ! जगातील एका आश्चर्यासाठी उभी असलेली, ही चीनची प्रचंड भिंत म्हणजे हूणांची ती मूर्तिमंत भीतीच होय !

' इकडे हूणांची जी अनेक घोडदळे मध्यआशियास तुडवीत चालली होती त्यांना त्यांच्या ' आटीला ' नावाच्या एका सेनापतीने संघटित करून आशिया ओलांडून युरोपकडे धाव मारली. त्या असंख्य घोडदळाच्या भिन्नभिन्न सैन्याने सापडेल त्या दिशेने युरोपियन रशियात घुसून नुसता हलकल्लोळ माजवून दिला. विद्यापीठे, कलापीठे, घरे, देवघरे, झोपड्या नि राजवाडे, ग्रामे नि नगरे जे दिसेल ते ते हूण पेटवीत चाललेल्या आगीच्या डोंबाळ्यात भस्म होऊन गेले. जो जो दिसेल त्याला ते कापीत सुटले. रशिया तुडवून ते पोलंडमध्ये घुसले. तेथून त्या हूणांच्या धाडी पुढच्या गाथ लोकांवर तुटून पडल्या. रोमन साम्राज्याचा, सैन्यामागून सैन्याचा त्यांनी धुव्वा उडविला. विजयापेक्षा हूणांच्या क्रूरतेला विध्वंसाचीच अधिक आवड असे. त्याने सारे युरोप नुसते पराभूत झाले, इतकेच नव्हे तर सारे युरोप रक्तात न्हाऊन निघाले, वैराण झाले. बहुतेक युरोपियन भाषांतून कोणा दुष्टाला शिवी हासडायची तर आजही त्याला ' अे हूण ' असेच म्हणतात, जसे आपण ' पिशाच्च ' म्हणतो, इतकी ह्या हूणांची धास्ती ह्या युरोपने खाल्ली होती.

" मध्य आशियातून हूणांचा एक महापूर जसा वर सांगितल्याप्रमाणे युरोपवर कोसळला तसाच त्यांच्या घोडदळाचा दुसरा महापूर काही काळ

हिमालयाभोवती घोटाळत घोटाळत आणि हिमालयाच्या पलीकडच्या शककुशाणांच्या उरल्यासुरल्या राज्यांचा नि लोकांचा नायनाट करीत शेवटी भारताच्या वायव्येकडील गान्धारप्रभृती प्रदेशांवरही कोसळला. चीनच्या, रशियाच्या, रोमच्या साम्राज्याची नि राज्यांची जशी दुर्दशा उडविली त्याच आवेशाने नि आवेगाने भारतासही ह्या टोकापासून त्या टोकापर्यंत तुडवून टाकू अशा उतावीळ ईर्ष्येने ह्या हूणांच्या टोळधाडी गान्धार प्रांत तुडवीत सिन्धूकडे घुसू लागल्या."

पराक्रमी स्कन्धगुप्ताने आपल्या अंगच्या अतुल शौर्याने ह्या रानटी हूण लोकांचा पराभव केला. हूणांची एवढी हानी स्कन्धगुप्ताने केली की, पुढे कित्येक वर्षे त्यांना भारताकडे वक्रदृष्टीने पाहता आले नाही. स्कन्धगुप्ताची प्रशस्ती गाताना एका लेखात असे म्हटले आहे की, 'गुप्तकुलातील विचलित झालेल्या लक्ष्मीला आपल्या बाहुबलाने त्याने पुन्हा प्रस्थापित केले.'

या परकीय आक्रमणाचा बंदोबस्त केल्यावर स्कन्धगुप्ताला देशातीलच काही उठाव मोडून काढावे लागले होते. गोविन्दगुप्त नावाचा दुसऱ्या चंद्रगुप्ताला एक मुलगा होता आणि तो वैशाली येथे राज्यपाल म्हणून कारभार पाहात होता. कुमारगुप्ताच्या काळात तो मालव प्रदेशाचा राज्यपाल होता. कुमारगुप्ताच्या मृत्यूनंतर त्याने तेथे स्वतंत्र राज्यस्थापनेचा प्रयत्न केला होता परंतु स्कन्धगुप्ताने त्याचा हा प्रयत्न हाणून पाडला होता. स्कन्धगुप्ताच्या काळात पुढे गोविंदगुप्ताने कसलेही आक्रमक कृत्य केले नाही.

कुमारगुप्ताच्या निधनानंतर वाकाटकांनीही माळव्यावर स्वामित्व गाजविण्याचा प्रयत्न केला होता. हा काळ राजकीयदृष्ट्या धामधूमीचाच होता. वाकाटकांनीही ह्या संधीचा फायदा उठविला होता. परंतु स्कन्धगुप्ताचे साम्राज्य पश्चिमेकडे गुजराथपर्यंत पसरलेले होते आणि सर्व

धोक्याच्या ठिकाणांवर त्याने गोप्तांची म्हणजे रक्षकांची नियुक्ती केली नाही त्यामुळे वाकाटकांच्या प्रयत्नालाही यश लाभले नाही.

जुनागढच्या लेखात एके ठिकाणी भुजंगरूपी राजाला, जो फारच शक्तिशाली होता, त्याला स्कन्धगुप्ताने पराभूत केले असे म्हटलेले आहे. नागवंशातील एखाद्या राजाचा स्कन्धगुप्ताने पराभव केला होता असे यावरून दिसते.

कुमारगुप्ताच्या निधनानंतर उपस्थित झालेले हे लहान लहान उपद्रव स्कन्धगुप्ताने आपल्या बाहुबलाने शमवून टाकले होते.

स्कन्धगुप्ताच्या काळातील काही लेखांवरून त्याच्या राज्यातील पदाधिकाऱ्यांच्याविषयी काही माहिती मिळते.

पर्णदत्त : हा सौराष्ट्र प्रांताचा राज्यपाल होता. स्कन्धगुप्ताच्या सर्व अधिकाऱ्यांमध्ये हा अत्यंत दक्ष आणि सुयोग्य अधिकारी होता. त्याने आपल्या अधिकाराखालील प्रदेशाचे उत्तम प्रकारे रक्षण केलेले होते. फारसी लेखांमध्ये याला 'फर्नदत्त' असे म्हटलेले आहे.

शर्वनाग : हा गंगा आणि यमुना या नद्यांच्यामधील प्रदेशाचा विषयपती होता. बुलन्द शहर जिल्ह्यातील इन्दौर नावाच्या गावात असलेल्या ताम्रपटामध्ये याचा उल्लेख आढळतो.

भीमवर्मा : हा कोसम नावाच्या भागात कारभार पाहात होता.

चक्रपालित : हा गुजराथमधील गिरिनगर नावाच्या ठिकाणचा सर्वोच्च पदाधिकारी होता.

स्कन्धगुप्ताने संकटकाळी जरी राज्याधिकार हाती घेतला होता तरी त्याने सर्व संकटांचे निवारण करून आपले राज्य उत्तम प्रकारे चालविलेले होते. जुनागढ येथील लेखामध्ये स्कन्धगुप्ताच्या राज्यव्यवस्थेची प्रशंसा केलेली आहे. या लेखांनुसार या सम्राटाच्या राज्यात कोणाला विशेष जबर शिक्षा दिल्या जात नसत आणि कोणाची फार गांजवणूकही होत

नसे. अधिकाऱ्यांच्या नेमणुका करताना त्यांच्या योग्यतेकडे विशेष लक्ष पुरविले जात असे. गुजराथचा राज्यपाल पर्णदत्त हा बुद्धिमान, विनम्र, सत्यवादी, उदार, दाक्षिण्ययुक्त, मधुरभाषी, यशस्वी, सम्राटांचा भक्त, सर्व प्रकारच्या दोषांच्या पलीकडील आणि लोकोपकारी होता असे त्याच्याविषयी जुनागढ येथील लेखात म्हटलेले आहे. गिरिनगरचा नगराध्यक्ष चक्रपालित हा क्षमा, प्रभुत्व, विनय, न्याय, शौर्य, दाक्षिण्य आणि धैर्य इत्यादी गुणांनी युक्त होता असे म्हटलेले आहे. तो आपल्या नगरातील लोकांना पुत्राप्रमाणे मानत असे. नागरिकांच्या वैयक्तिक अडचणींचे निवारण करण्याचा प्रयत्न तो करीत असे. त्यांना आनंदी आणि सुखी ठेवीत असे. त्यामुळे तो फारच लोकप्रिय होता.

स्कन्धगुप्ताच्या काही स्थानिक अधिकाऱ्यांची नावे आग्रहारिक, शौल्किक, गौल्मिक अशी होती. अग्रहारिक याच्याकडे दानात दिलेल्या भूमीची देखरेख करण्याचे काम असे. शौल्किक हा कर वसुली पहाणारा अधिकारी होता आणि गौल्मिक याच्याकडे जंगलांची व्यवस्था पहाण्याचे काम असे.

स्कन्धगुप्ताने लोकहिताच्या दृष्टीने अनेक तऱ्हेची कामे केलेली होती. त्याच्या या लोकहितकारी कृत्यांचा उल्लेख तत्कालीन शिलालेखां-मधून आढळतो. तो दीनांवर दया दाखवीत असे. तो प्रजावत्सल होता. त्यामुळे प्रजाजन त्याच्या गुणांची प्रशंसा करीत असत. त्याने केलेल्या सार्वजनिक कामाचे एक उत्तम उदाहरण म्हणून गिरिनगर येथील सुदर्शन सरोवराच्या बांधाचा जीर्णोद्धार हे देता येईल. या सुदर्शन सरोवराची निर्मिती चंद्रगुप्त मौर्याच्या काळामध्ये त्याचा एक राज्यपाल पुष्यगुप्त याने केलेली होती. हा पुष्यगुप्त सौराष्ट्रातील चंद्रगुप्ताचा एक प्रांतीय शासक होता. गिरिनार पर्वताच्या जवळच हे सरोवर लोकांच्या सोयीसाठी निर्मिण्यात आलेले होते. सम्राट अशोकाच्या काळात त्याचा

राज्यपाल तुषास्प याने या सरोवराला कालवे काढून दिले होते. रुद्रदामन या शक क्षत्रपाने आपल्या मंत्रिमंडळाचा विरोध असतानाही केवळ लोकांच्या सोयीसाठी म्हणून वैयक्तिकरीत्या खर्च करून या सरोवराच्या बांधाची पुनर्बांधणी केलेली होती. त्यावेळी सरोवराच्या बांधाची बरीच पडझड झाली होती आणि पाण्याची टंचाई फारच जाणवू लागली होती. इ. स. ४५५ मध्ये हा बांध पुन्हा ढासळला. त्या वर्षी भयंकर असा पाऊस पडला होता व त्यामुळे बांधाची पडझड झालेली होती. नागरिकांना पाण्याची तीव्र टंचाई भासू लागली होती. पाण्याकरिता फार कष्ट उपसावे लागत होते. तेव्हा राज्यातील नागरिकांचे हित लक्षात घेऊन स्कन्धगुप्ताने आपला तेथील राज्यपाल पर्णदत्त यास हा बांध पुन्हा बांधण्याची आज्ञा दिली. पर्णदत्ताचा पुत्र चक्रपालित हा गिरि-नगरचा पूरपती होता. त्याने इ. स. ४५६ मध्ये बराच खर्च करून या सरोवराला नवीन बांध घातला. त्यामुळे त्या भागातील नागरिकांचे हाल वाचले. हा नवीन बांध सुमारे १०० हात लांबीचा, ६८ हात रुंदीचा असा भरभक्कम होता. याची उंची ७ पुरुष उंच इतकी होती. सरो-वराच्या जवळच चक्रपाल याने विष्णूचे एक मंदिरही बांधले होते. पुढील काळात गिरिनगरचे राजकीय महत्त्व कमी झाल्यामुळे या सरोवरा-कडेही राज्यकर्त्यांचे दुर्लक्ष झाले असावे. सुदर्शन सरोवर व विष्णूमंदिर यांचे कसलेच चिन्ह आज तेथे उपलब्ध नाही.

आपल्या वंशातील पूर्वजांप्रमाणेच स्कन्धगुप्तानेही धार्मिक क्षेत्रामध्ये सहिष्णुतेची आणि उदारतेची भूमिका धारण केलेली होती. स्कन्धगुप्त हा स्वतः धर्मनिष्ठ वैष्णव होता. त्याला परमभागवत अशी उपाधी होती. त्याच्या काळी वैष्णवपंथी लोक बरेच होते. गिरिनगरचा पूरपती चक्र-पालित हा वैष्णवधर्मी होता. आणि त्याने विष्णूचे मंदिर बांधलेले होते. विष्णू, कार्तिकेय त्याचप्रमाणे सप्तमातृका यांच्या मूर्तींची प्रतिष्ठापना

केल्याचे उल्लेख त्या काळातील लेखांमधून आढळतात. स्कन्धगुप्ताच्या काळात सूर्योपासनाही चालत असे. इन्द्रपूर नावाच्या गावात एक सूर्य-मंदिर होते. तेथील शिलालेखाची सुरुवात सूर्यपूजेनेच केलेली आहे. दुसऱ्या एका लेखाच्या सुरुवातीलाच विष्णूची स्तुती केलेली आहे. परंतु असे असले तरी स्कन्धगुप्त जैन आणि बौद्ध या धर्मांकडेही आदराने पाहात असे. तसेच तो वैष्णव असूनही शैव पंथाविषयी आस्था दाख-वीत असे. कहौम येथील एका शिलालेखामध्ये मद्र नावाच्या एका व्यक्तीने आदिनाथ, शांतिनाथ, नेमिनाथ, पार्श्वनाथ आणि महावीर अशा पाच जैन तीर्थंकरांच्या मूर्ती रेखलेल्या आहेत. इन्दौर येथील एका लेखावरून अशी माहिती मिळते की, तेथे क्षत्रियांनी सूर्यमंदिर बांधले होते आणि त्या मंदिरातील नंदादीपासाठी खर्चाची व्यवस्था करण्याच्या हेतूने एका ब्राह्मणाने बरेच दान दिले होते.

स्कन्धगुप्ताच्या राज्यकालातील आर्थिक स्थिती समाधानकारक होती. शिलालेखांवरून या विषयीदेखील माहिती मिळते. व्यवसायिकांच्या समित्या ‘श्रेणी’ अस्तित्वात होत्या. इन्द्रपूर येथील लेखात अशा एका तैलिक श्रेणीचा म्हणजे तेली लोकांच्या समितीचा उल्लेख आढळतो. धर्मबुद्धीने दान करणारे लोक अशा समित्यांकडे आपली रक्कम व्याजी लावीत असत आणि त्या व्याजातून त्यांच्या इच्छेनुसार धर्मकृत्ये चाल-विली जात असत.

स्कन्धगुप्ताला राज्यावर येताच स्वकीय आणि परकीय शत्रूंशी लढून त्यांचा बंदोबस्त करावा लागला. त्यामुळे त्याचा बराचसा काळ रणांगणा-वरच गेला. हूणांचा पहिला हल्ला परतविल्यानंतर पुनश्च स्कन्धगुप्ताच्या उत्तर काळातही त्यांनी हल्ला केला होता, असे काही इतिहासकारांचे म्हणणे आहे. या संदर्भात स्वातंत्र्यवीर सावरकरांनी लिहिले आहे की, “मध्यंतरी युरोपवर धाड घालणाऱ्या हूणांचा कर्तृत्ववान सेनापती

आटिलाप्रमाणेच आशियातील हूणांच्या विलग विलग सैन्यांना एकत्र करून खिंखिल नावाच्या त्यांच्या एका कर्तृत्ववान पुढाऱ्याने आपल्या आधिपत्याखाली दुसरे एक केंद्र संघटिले होते आणि तो स्वतः त्यांचा राजा म्हणवून घेऊ लागला होता. भारतात मागे झालेल्या हूणांच्या पराभवाचे उट्टे काढण्यासाठी आणि भरतखंड जिंकून घेण्यासाठी त्याने ह्या नव्या संघटनेच्या बळावर भारतावर पुन्हा स्वारी केली. ही गोष्ट सम्राट स्कन्धगुप्ताच्या राजवटीच्या उत्तर काळात घडली."

"पहिल्या धडाक्यातच हूणांनी भारतीय साम्राज्याच्या वायव्य प्रांतावर रक्षणार्थ ठेवलेल्या साम्राज्यीय सैन्याचा एक-दोन ठिकाणी पराभव करून त्यांना मागे हटविले. हे कळताच त्याचे आता उतारवय झाले असताही सम्राट स्कन्धगुप्त हूणांशी तोंड द्यायला आपली राजधानी सोडून स्वतः पंचनदीपर्यंत चालून गेला. हूणांनी मागे हटविलेल्या आपल्या साम्राज्य-सैन्याची पुन्हा सिद्धता करून हूणांवर उलट चढाई करण्याच्या सिद्धतेत तो तिकडे समरशिबिरात असताना इकडे पाटलीपुत्र नगरात त्याचा सावत्र भाऊ पुरगुप्त स्कंधगुप्ताचे सिंहासन बळकावण्याचे अधम कृत्य करण्याच्या बेतात आहे असे त्याला कळले. तरीही वैयक्तिक स्वार्थास तुच्छ मानून तो स्वराष्ट्राभिमानी सेनानी स्कन्धगुप्त न परतता म्लेंच्छांशी तिकडे झुंजतच राहिला. कारण साम्राज्यसेनेस तिकडेच सोडून जर तो गृहकलहापायी परत राजधानीस येता तर त्या भारतीय सैन्याचे धैर्य खचून तो बांध फुटताच महापुराप्रमाणे हूणांची क्रूर सैन्ये सारा पंजाब नि अर्धा उत्तर भारत हां हां म्हणता ग्रासून टाकती. या शंकेने तो वृद्ध सम्राट तिकडे समरशिबिरातच राहून शत्रूशी झुंजत होता. सम्राट असावा तर असा!"

"आणि आपल्या राष्ट्रासाठी असा लढत असतानाच तो वृद्ध वीरावतंस स्कन्धगुप्त इ. स. ४७१ चे आसपास समरशिबिरातच मरण पावला.

सम्राट असावा तर असा !"

"रोमन साम्राज्याच्या भरभराटीच्या काळात होऊन गेलेल्या एका नामांकित रोमन सम्राटाविषयी अशी एक कथा सांगण्यात येते की, तो आपल्या राजवाड्यात मरणासन्न होऊन पडला असता अकस्मात उठून नि खड्ग हाती घेऊन उभा राहिला, हे पहाताच त्याला वायूचा झटका आला की काय अशा शंकेने त्याचे राजवैद्य नि परिचारिक घाबरून 'हां हां महाराज हे काय !' असे म्हणत त्याला खाली निजवू लागले, तेव्हा आपला अंतिम श्वास सोडण्याच्या आधी तो म्हणाला, 'दूर व्हा, रोमचा सम्राट शय्येवर लोळत घोळत मरता कामा नये ! रोमच्या सम्राटाने आपल्या पायांवर ताठ उभे राहून रणसज्ज पावित्र्यातच उभ्याउभ्या मेले पाहिजे ! 'ए रोमन एम्परर मस्ट डाय स्टँडिंग.' "

"अशाच बाणेदारपणाने म्लेंच्छ शत्रूशी झुंजत भारताचा हा सम्राट स्कन्धगुप्त सम्राट असताही सैनिकासारखा समरशिबिरात मरण पावला. पूर्वी त्याच्या तारुण्यात त्याने अनावर हूणांच्या टोळधाडीची नांगी ठेचून त्यांना सीमापार पिटाळून दिले होते. आता वृद्धापकाळीही त्याच प्रबळ राष्ट्रशत्रूशी तो रणांगणात उतरून झुंजत होता. सारे राजविलास उपलब्ध असताही त्यांच्याकडे पाठ फिरवून आपल्या जीवनाची एकंदर पंधरा-वीस वर्षे तरी भारतीय साम्राज्याच्या नि स्वातंत्र्याच्या रक्षणार्थ त्याने रणशिबिरातील खडतर नि कठोर अवस्थेत काढली. त्याला त्या काळात अत्यंत क्लेष सोसावे लागले. पण त्याने ते सर्व कष्ट सोसून त्या विस्तृत भारतीय साम्राज्याला धक्का लागू न देता त्याच्या संरक्षणार्थ शेवटी देह ठेवला, तोही राष्ट्रशत्रूशी झुंजता झुंझता, एखाद्या सैनिकासारखा, पंचनदातील सुदूरच्या रणशिबिरात !—राजधानीतील प्रासादात नव्हे ! ! सम्राट असावा तर असा !"

"ज्या पन्नास वर्षांत हूणांनी इकडे चीनचे प्रदेश उद्ध्वस्त करून

तिकडे रशिया ते रोमन साम्राज्यापर्यंतचा प्रदेश पादाक्रांत केला, त्याच पन्नास वर्षांत त्या प्रबळ शत्रूला त्याच्या हाताशी असलेल्या भारतावर ते वारंवार चढाया करीत असताही जर सिंधूनदीपर्यंतच्या एका कोपऱ्या-पलीकडे स्थिरपणे पाऊल टाकता आले नसेल तर ते सम्राट स्कन्धगुप्ताच्या नि भारतीय सैन्यबळाच्या प्रतापामुळेच होय. नाही तर हूणांच्या भर उन्मादात साऱ्या आशिया-युरोपची त्यांनी जी दुर्दशा उडवून दिली तीच त्यांनी साऱ्या भारताचीही उडविली असती. हूणांचा पूर्ण निःपात होण्या-पूर्वीच सम्राट स्कन्धगुप्ताला मृत्यू आला. पण त्याच्या या प्रतापामुळेच पूर्वीचा भर उन्माद ओसरून क्षीणबल झालेल्या ह्या हूणांचा निःपात करणारी बलाढ्य वीरांची पिढी भारतात लवकरच रणांगणात उतरण्याची शक्यता झाली. यास्तव सम्राट स्कन्धगुप्ताच्या स्मृतिसमाधीला विक्रमा-दित्यासारख्या कोणत्याही दिग्विजयी भारतीय सम्राटाला वाहावी तितक्याच गौरवाने, अभिमानाने नि राष्ट्रीय कृतज्ञतेने आम्ही श्रद्धांजली वाहात आहोत!"

अशा प्रकारे स्कंधगुप्ताची राजवट बरीचशी युद्धातच गेली असली तरी परकीय आक्रमणाच्या बंदोबस्ताचा काळ शांतीचा होता. या काळात स्कंधगुप्ताच्याही काही मुद्रा उपलब्ध झाल्या आहेत. याच्या काळातील सुवर्णमुद्रा वजनाने अधिक भाराच्या आहेत. कुमारगुप्तकालीन सुवर्णमुद्रा १३२ ग्रॅम वजनाच्या आहेत तर स्कन्धगुप्ताच्या १४४ ग्रॅम वजनाच्या आहेत. स्मृतींमध्ये राजाच्या सुवर्णमुद्रा ८० रती वजनाच्या असाव्यात असे म्हटलेले आहे. स्कन्धगुप्ताने या आदेशानुसारच आपल्या सुवर्णमुद्रा ८० रती वजनाच्या म्हणजेच १४४ ग्रॅम वजनाच्या बनविलेल्या असल्या पाहिजेत.

धनुर्धारी, राजा आणि लक्ष्मी, अश्वारोही, छत्र इत्यादी प्रकारच्या या काळातील मुद्रा उपलब्ध झालेल्या आहेत. धनुर्धारी प्रकारच्या सर्वांत

लोकप्रिय असलेल्या वरच्या भागावर सम्राट लांब कोट आणि पायजमा घालून उभा आहे. त्याच्या डाव्या हातात धनुष्य आणि उजव्या हातात बाण आहे. त्याच्या बाजूला 'जयति महितलम् सुधन्वी'-म्हणजे उत्तम धनुर्धर. पृथ्वी जिंकता असा व 'परहितकारी राजा जयति दिवं श्रीक्रमादित्यः'-म्हणजे दुसऱ्याचे हित करणारा राजा क्रमादित्य हा स्वर्गही जिंकतो. असे दोन प्रकारचे लेख कोरलेले आहेत. या मुद्रेच्या पृष्ठभागावर कमलमण्डलयुक्त कमलासनालक्ष्मी कोरलेली आहे.

दुसऱ्या काही मुद्रांवर राजा आणि लक्ष्मी यांची चित्रे रेखलेली आहेत आणि छत्र प्रकारच्या–मुद्रेवर राजा हार आणि भुजबंध घालून उभा आहे आणि उजव्या हाताने यज्ञामध्ये आहुति देत आहे, असे चित्र आहे. राजाच्या पाठीमागे छत्र हाती घेतलेला त्याचा सेवक आहे. या मुद्रेच्या पृष्ठभागी प्रभामण्डलयुक्त देवीची आकृती असून 'क्रमादित्य' अशी राजाची उपाधी रेखलेली आहे.

अश्वारोही प्रकारातील मुद्रेवर सम्राट घोड्यावर बसलेला आहे. पृष्ठभागी देवीची आकृती आहे. या मुद्रेवरही 'क्रमादित्य' अशी उपाधि कोरलेली आहे.


स्कन्धगुप्तकालीन काही रजत–मुद्राही उपलब्ध झालेल्या आहेत. पश्चिम भागात रजत-मुद्रा प्रचलित होत्या. गुजराथ, वल्लभी आणि पश्चिम माळवा हे प्रदेश स्कन्धगुप्ताच्या साम्राज्यात होते त्यामुळे या प्रकारच्या मुद्रा त्याने काढल्या होत्या. त्याच्या रजत–मुद्रांमध्ये गरुड, नंदी आणि वेदी अशा तीन प्रकारच्या मुद्रा आहेत. गरुड प्रकारच्या मुद्रांवर राजाचे अर्धचित्र रेखलेले आहे. या मुद्रांच्या पृष्ठभागावर गरुडाचे चित्र असून 'परमभागवतमहाराजाधिराजश्रीस्कन्धगुप्तक्रमादित्य' असा लेख कोरलेला आहे. नंदी प्रकारच्या मुद्रांमध्ये गरुडाचे जागी नंदीचे चित्र आढळते. गुप्त वंशाच्या पूर्वी पद्मावती येथील नाग वंशातील राजांचे नंदी हे चिन्ह

होते. गुप्तांच्यानंतर कलचुरि-राजांच्या मुद्रांवरही नंदीचे चित्र पाहावयास मिळते. या प्रकारच्या मुद्रा माळव्यामध्ये प्रचलित होत्या. वेदी प्रकारच्या मुद्रांच्या पृष्ठभागी वेदीचे चित्र आहे. मध्यदेशीय मुद्रांवर पंख पसरलेल्या मोराचे चित्र रेखलेले असून पृष्ठभागी 'श्रीस्कन्धगुप्तो दिवं जयति'— स्कन्धगुप्त स्वर्ग जिंकतो असा लेख कोरलेला आहे.

केवळ गुप्त वंशीय सम्राटांच्यामध्येच नव्हे तर भारतातील महान सम्राटांच्यामध्ये स्कन्धगुप्ताची गणना केली जाते. युवराज असतानाच त्याने पुष्यमित्राचा पराभव करून आपल्या अंगच्या शौर्याची आणि साहसाची साक्ष पटविली होती. त्याचे स्कन्ध हे नाव कार्तिकेयाशी संबंधित आहे. मोर हे कार्तिकेयाचे वाहन आहे. स्कन्धगुप्ताच्या काही रजतमुद्रांवर मोराचे चित्र रेखलेले आहे. कार्तिकेयाचे वैशिष्ट्य म्हणजे सेनापतित्व होय. स्कन्धगुप्ताच्या व्यक्तित्वामध्येदेखील ह्याच गुणाचा प्रकर्ष आढळतो. याने केलेला हूणांचा पराभव हा इतिहासात त्याला 'भारताचा संरक्षक' म्हणून महत्त्वाचे स्थान देतो. हूणांचा पराभव करणारा युरोप आणि आशिया या दोन्ही खंडांतील हा सर्वश्रेष्ठ वीर होता. हूणांच्या रानटी टोळ्यांपासून होणारा देशाचा विनाश त्याने थांबविला आणि देशाची महान सेवा त्याने केली.

□

वाचनालय
2283 दिनांक 22190
विषय



# सुवर्णयुगाच्या अस्तकाली

स्कन्धगुप्तानंतर गुप्त-वंशामध्ये त्याच्या योग्यतेचा सम्राट झाला नाही. याच्या पश्चात त्याचा पुत्र दुसरा कुमारगुप्त हा सम्राट बनला. याच्या काळातील एकच लेख सारनाथ येथे उपलब्ध झालेला आहे. याच्या कारकीर्दीत व्यापाराची बरीच उन्नती झालेली होती. विणकराच्या समितीने दशपूर सूर्यमंदिराचा जीर्णोद्धार याच काळात केला होता. यावरून रेशमी वस्त्र निर्मितीचे कार्य या काळात अत्यंत भरभराटलेले होते व या व्यापाऱ्यांना पुष्कळसे धन मिळत होते असे दिसते. सारनाथ येथील लेख बौद्ध प्रतिमेवर कोरलेला आहे. ही प्रतिमा अत्यंत भव्य होती. अभयमित्र नावाच्या एका बौद्ध भिक्षूने आपले माता-पिता आणि गुरुजन यांच्या स्मरणार्थ आणि स्वतःच्या अध्यात्मिक लाभाप्रीत्यर्थ ही प्रतिमा तयार केली होती. तिच्यात गौतमबुद्ध हा शास्ता आणि अप्रतिम गुणांनी युक्त होता असे म्हटलेले आहे.

दुसऱ्या कुमारगुप्ताच्या मुद्रांवरही ‘ क्रमादित्य ’ अशी उपाधि कोरलेली आढळते. याचा एक सामन्त महाराज हस्तिन् या नावाचा होता. याचा एक ताम्रलेख ‘ खोह ’ येथे सापडलेला आहे. तो गुप्त-संवत् १५६ म्हणजे इ. स. ४७५ मधील आहे. या लेखानुसार महाराज हस्तिन् हा गुप्त सम्राटाचा मांडलिक होता. तो मोठा धार्मिक आणि शक्तीशाली होता. त्याने सहस्रावधी गाई, हत्ती, घोडे, सुवर्णमुद्रा आणि भूमी दानामध्ये दिलेली होती. या लेखात त्याला शेकडो युद्धांचा विजेता असे म्हटलेले आहे. हस्तिन् ‘ परिव्राजक ’—महाराज वंशात जन्मलेला होता. या वंशातील राजे बुंदेलखंडात राज्य करीत होते. हे सर्व गुप्त सम्राटांचे अंकित होते. महाराज हस्तिन् याच्या काळात या सामन्त परिवाराने बरीच प्रतिष्ठा व शक्तीसंचय केला होता. आणि दुसऱ्या कुमारगुप्ताच्या काळापासूनच या भागावरील गुप्त सम्राटांचे नियंत्रण शिथिल होऊ लागले होते.

दुसऱ्या कुमारगुप्ताचे राज्य गुप्त संवत् १५७ म्हणजे इ. स. ४७७ मध्ये संपुष्टात आले.

दुसऱ्या कुमारगुप्तानंतर बुधगुप्त राज्यावर आला. याच्या काळातील इ. स. ४७७ मधील एक लेख सारनाथ येथे आहे. ह्यूएनत्संग याच्या मतानुसार बुधगुप्त हा शक्रादित्य याचा पुत्र होता. बुधगुप्ताने आपल्या बाहुबलावर सिंहासन प्राप्त करून घेतले होते असे काही विद्वानांचे मत आहे. बुधगुप्ताचा कुमारगुप्ताशी कशा प्रकारचा नातेसंबंध होता याविषयी माहिती उपलब्ध नाही. काही विद्वानांनी याला पहिल्या कुमारगुप्ताचा पुत्र मानले आहे. नालंदा येथील मुद्रालेखावरून बुधगुप्त हा पुरुगुप्ताचा मुलगा होता असे काही विद्वान मानतात.

गुप्त साम्राज्याच्या मावळत्या साम्राज्यातील सर्वांत अधिक शक्तिशाली राजा बुधगुप्त हाच होता. याच्या काळातील पाच लेख उपलब्ध झालेले

असून त्यावरून तो माळव्यापासून बंगालपर्यंतच्या विस्तृत भूभागावर राज्य करीत होता असे स्पष्ट दिसते. सारनाथ येथील लेखावरून काशीजनपद हे त्याच्या सत्तेखाली होते असे दिसते. एरण येथील याच्या लेखावरून तेथील राजा मातृविष्णु हा याचा मांडलीक होता आणि त्याने आपल्या मातापित्यांच्या स्मरणार्थ विष्णूध्वजाची स्थापना केली होती असे कळते. सुरश्मिचन्द्र नावाचा राज्यपाल नर्मदा आणि यमुना नदीच्या मधल्या भागावर कारभार करीत होता असेही या लेखावरून कळते.

गुप्तकाळामध्ये प्रांत आणि जिल्हा यांच्या सीमा या नद्यांवरून ओळखल्या जात होत्या असे दिसते. बुधगुप्ताच्या काळातील आणखी दोन लेख बंगालमधील दिनाजपूर जिल्ह्यातील दामोदरपूर नावाच्या गावात उपलब्ध झालेले आहेत. त्यातील एक लेख गुप्त संवत् १६३ म्हणजेच इ. स. ४८२–८३ मधील आहे. त्यात बुधगुप्ताचा उल्लेख ‘ परमदैवत ’, ‘ परमभट्टारक ’, आणि ‘ महाराजाधिराज ’ अशा गौरव-उपाधींनी केलेला आहे.

बुधगुप्ताच्या काळामध्ये गुप्त-वंशाच्या लुप्त झालेल्या समृद्धीचे पुनर्जीवन झाल्यासारखे दिसते. सौराष्ट्रातील मैत्रक नरेशही बुधगुप्ताच्या आधीन होते. या वंशातील महाराज द्रोणसिंह याचा इ. स. ५०२ मधील एक शिलालेख उपलब्ध झालेला आहे. त्यात याला ‘ परमभट्टारकपादानुध्यात ’ असे म्हटलेले आहे. तो यापूर्वीपासूनच राज्य करीत असावा. हा बुधगुप्ताचा समकालीन होता.

महाराज हस्तिन् हा बुधगुप्ताच्या काळातील गुप्तांचा सामन्त होता. या लेखात हस्तिन्‌ने दिलेल्या अग्रहार दानाचा उल्लेख आहे. यावरून त्या काळातील ब्राह्मण धर्माच्या उन्नतीची कल्पना येते. भारद्वाज, कौत्स, भार्गव, वासुल इत्यादी ब्राह्मण गोत्रांचा उल्लेखही आढळतो, तसेच वाजसनेय आणि कठ या काही वैदिक शाखांचा उल्लेखही आढळतो.

बुधगुप्ताच्या लेखांमध्ये ' परमभागवत ' अशी उपाधि आढळत नाही, त्यावरून तो वैष्णव धर्माचा नव्हता असे दिसते. त्याला बौद्ध धर्माविषयी विशेष आस्था होती असे ह्युएनत्संग याच्या वर्णनावरून कळते. त्याने नालंदा विश्वविद्यालयाला देखील आर्थिक सहाय्य दिलेले होते.

बुधगुप्ताच्या राजवटीच्या अखेरीस काही बाह्य आक्रमणे झालेली होती. वाकटकांच्या लेखानुसार नरेन्द्रसेन राजाने कोसल, मेकला आणि माळवा या प्रदेशावर अधिकार स्थापन केला होता. नरेन्द्रसेन हा बुधगुप्ताचा समकालीन होता. याचाच अर्थ असा की, दक्षिणेकडून गुप्त-साम्राज्यावर आक्रमण झालेले होते. तसेच बुंदेलखंडावरीलही गुप्तांचा अधिकार क्षीण झालेला होता. त्या काळातील तेथील राजांच्या शिलालेखामध्ये गुप्त सम्राटांच्या प्रभुत्वाचा उल्लेख केलेला आढळत नाही.

बुधगुप्ताच्या सामन्तांनी आणि अधिकाऱ्यांनीही आपापल्या कार्यक्षेत्रात आपली सत्ता वाढविण्यास प्रारंभ केला होता. काही सामन्त तर स्वतःला महाराजा म्हणवून घेऊ लागले होते. बुधगुप्ताच्या राजवटीच्या अखेरच्या दिवसांत हूणांनीही परत आक्रमण केले होते. या प्रकारच्या आक्रमणामुळे गुप्त साम्राज्याची शक्ती क्षीण झालेली होती. बुधगुप्ताने इ. स. ४९५ पर्यंत राज्य केले. त्याच्यानंतर त्याचा धाकटा भाऊ नरसिंहगुप्त हा राज्यावर बसला. याच्या राज्यकालाच्या सुरुवातीलाच बरीच संकटे उभी राहिलेली होती. अन्तर्गत झगडे, सामन्तांची आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांची सत्तालोलुपता इत्यादी फुटीर प्रवृत्ती प्रबळ होऊ लागल्या होत्या. त्यांचा बंदोबस्त करण्याचे काम नरसिंहगुप्ताला हाती घ्यावे लागले होते.

याच सुमाराला हूण राजा तोरमाण याचा उपद्रव वाढलेला होता. त्याने गंगेच्या खोऱ्यात आपली सत्ता वाढविण्यास सुरुवात केली होती. पूर्व माळवा त्याने आपल्या ताब्यात घेतला होता.

अन्तर्गत कलहाला यावेळी तीव्र स्वरूप प्राप्त झालेले होते. गुप्त-साम्राज्यातील पश्चिमेकडील भागात भानुगुप्त नावाच्या राजकुमाराने आपली स्वतंत्र सत्ता स्थापन केली होती. गुप्त साम्राज्याच्या पूर्व भागामध्ये वैण्यगुप्त नावाच्या गुप्त-वंशीय राजकुमाराने आपले राज्य स्थापन केले होते. अशा प्रकारे बुधगुप्ताच्या मृत्यूनंतर गुप्तसाम्राज्य तीन प्रतिस्पर्धी राज्यां-मध्ये विभक्त झाले होते. पश्चिमेकडे भानुगुप्त, पूर्वेकडे वैण्यगुप्त आणि या दोहोंच्या मधल्या मगध प्रदेशावर नरसिंहगुप्ताचे राज्य होते.

भानुगुप्ताविषयी एका लेखाशिवाय कसलीही माहिती उपलब्ध नाही. त्याची नाणीही उपलब्ध नाहीत. एरण येथील लेखामध्ये भानुगुप्ताला विख्यात शूर सम्राट असे म्हटलेले आहे. त्यात त्याचा मित्र गोपराज याचा उल्लेख आढळतो. याने भानुगुप्ताच्या बाजूने एका युद्धात भाग घेतला होता. त्या युद्धात तो मारला गेला त्यावेळी त्याची पत्नी सती गेली होती. हे युद्ध हूणाच्यांविरुद्ध झाले असावे आणि त्यात भानुगुप्ताचा विजय झाला असावा. भानुगुप्ताचा राज्यकाल हा फारच लहान होता.

गुणैघर येथील ताम्रलेखांमध्ये वैण्यगुप्ताच्याही वंशपरंपरेचा उल्लेख आढळत नाही. त्याचा एक खंडित लेख नालंदा येथे उपलब्ध झालेला असून त्यातही त्याच्या पूर्वजांविषयी माहिती दिलेली नाही. मात्र त्याला ‘ महाराज ’ या पदवीने उल्लेखिलेले आहे. त्याच्या काही मुद्रा उपलब्ध झालेल्या आहेत. या लेखावरून तत्कालीन सामाजिक आणि सांस्कृतिक परिस्थितीची कल्पना येते. या लेखात वैण्यगुप्ताला ‘ भगवन्महादेवपादानु-ध्यात ’ असे म्हटलेले आहे. यावरून तो शैव पंथाचा अनुयायी होता हे स्पष्ट होते. याच लेखात ‘ अवलोकितेश्वराश्रम ’ विहाराचा उल्लेख आहे. वैण्यगुप्ताने या विहारात राहाणाऱ्या भिक्षू संघाला एक ग्राम संपूर्ण राज-कीय अधिकारांसह अग्रहार-दानात दिले होते. या विहाराची निर्मिती आचार्य शांतिदेव यांनी केली होती. वैण्यगुप्ताच्या दानापूर्वी त्याचा

सामन्तमहाराज रुद्रदत्त याने या विहाराला दान दिले होते. त्याच्या दानातून भिक्षूसंघाला वस्त्रभोजन, शयन, आसन आणि औषधे इत्यादींची व्यवस्था होत असे.

भितरी येथील लेखावरून नरसिंहगुप्त हा महादेवी श्रीचन्द्रदेवी आणि पुरुगुप्त यांचा मुलगा होता. नरसिंहगुप्तालाही परमभागवत असे म्हटलेले नाही. त्यावरून तो वैष्णव मताचा अनुयायी नसावा. याच्या मुद्रांवर ‘ बालादित्य ’ अशी याची उपाधी कोरलेली आहे. भानुगुप्त आणि वैण्यगुप्त या दोघांचेही राज्य अल्पजीवि ठरल्याने नरसिंहगुप्ताने पुनश्च आपला अधिकार स्थापन केला होता. याचे उल्लेखनीय यश म्हणजे याने हूणांवर मिळविलेला विजय होय. ह्युएनत्संगच्या मतानुसार बालादित्य नावाच्या गुप्त राजाने मिहिरकुल नावाच्या हूण राजाला पराभूत केले होते. त्याला बंदिवान करून त्याच्या सैन्याने बालादित्याच्या राजधानीत आणले होते. परंतु त्याच्या मातेच्या सांगण्यावरून मिहिरकुलाला त्याने मुक्त केले होते. राजकीयदृष्ट्या ही एक फार मोठी चूक घडली होती. कारण मुक्त केल्यानंतर मिहिरकुलाने पुन्हा भयंकर उपद्रव देण्यास सुरुवात केली होती. हूण युद्धाच्या वेळी बालादित्याला त्याच्या सामन्ताने बरीच मदत केली होती. ‘ मंजुश्रीमूककल्प ’ या ग्रंथामध्ये याला ‘ बालाख्य ’ आणि याच्या पुत्राला ‘ कुमाराख्य ’ असे म्हटलेले आहे.

नरसिंगुप्तानंतर त्याचा पुत्र तिसरा कुमारगुप्त हा राज्यावर आला. याच्या आईचे नाव मित्रदेवी असे होते. भितरी येथील लेखांमध्ये याला ‘ परमभागवत ’ अशी उपाधी दिलेली आहे, त्यावरून हा वैष्णव धर्माचा अनुयायी होता हे स्पष्ट होते. याच्या काळातील भितरी आणि नालंदा असे दोन लेख उपलब्ध आहेत. त्यावरून उत्तप्रदेश, बिहार आणि बंगाल या प्रदेशावर त्याचे राज्य होते असे अनुमान निघते. हा माळव्यातील राजा यशोधर्मन् याचा समकालीन होता.

तिसऱ्या कुमारगुप्तानंतर विष्णुगुप्त हा राजा झाला. नालंदा येथील लेखात विष्णुगुप्ताची वंशावळी दिलेली आहे. हा तिसऱ्या कुमारगुप्ताचा पुत्र होता. याच्या मुद्रांवर 'चंद्रादित्य' अशी याची पदवी कोरलेली आहे. गुप्त-वंशातील हा अखेरचा राजा होता. विष्णुगुप्ताने इ. स. ५५० पर्यंत राज्य केले. याच्यानंतर गुप्त साम्राज्याची समाप्ती झाली.

□

# गुप्त–साम्राज्य

गुप्तसाम्राज्याच्या उदयाप्रमाणे त्याचे पतन हे देखील भारतीय इतिहासातील महत्त्वाचे प्रकरण आहे. सम्राट समुद्रगुप्त आणि चंद्रगुप्त-विक्रमादित्य अशा पराक्रमी पुरुषांनी आपल्या बाहुबलाच्या जोरावर वर्धिष्णू केलेले साम्राज्य स्कन्धगुप्तानंतर ऱ्हास पावू लागले. स्कन्धगुप्तानंतर सुसंघटित असलेल्या गुप्त साम्राज्यामध्ये अनेक विघटनांच्या प्रवृत्तींनी डोके वर काढले होते. हूणांचे आक्रमण, साम्राज्यातील सामन्त सरदार आणि उच्च अधिकारी यांची सत्तालोलुपता, गृहकलह, शासन व्यवस्थेतील दोष, अशा काही कारणांनी हे साम्राज्य पतनाच्या दिशेकडे झुकले.

पहिल्या कुमारगुप्ताच्या राजवटीच्या उत्तरकाळापासूनच हूण या रानटी लोकांच्या टोळ्यांनी भारतावर हल्ले करण्यास सुरुवात केली होती. स्कन्धगुप्ताने त्यांना मोठ्या शर्थीने पराभूत केले होते. स्कन्धगुप्त

राज्यावर होता तोवर हूणांचे फारसे काही चालले नाही. स्कन्धगुप्ताच्या काळातच हूणांची दोन आक्रमणे झाली होती. परंतु पराभूत हूणांनी पुनः-पुन्हा आपले बळ एकवटून गुप्तसाम्राज्यावर हल्ले चढविले होते. बुध-गुप्ताच्या कारकीर्दीमध्ये पूर्व माळव्यातील एरण येथे मातृविष्णू नावाचा राजा गुप्तांचा मांडलीक म्हणून राज्य करीत होता परंतु मातृविष्णूच्या-नंतर त्याचा धाकटा भाऊ धन्यविष्णू त्याच प्रदेशावर हूण राजा तोरमाण याचे मांडलीकत्व स्वीकारून राज्य करू लागला होता. त्यानंतर भानु-गुप्ताच्या काळातही हूणांशी संघर्ष झाला होता. कालांतराने मिहिरकुल या हूण राजाने गुप्त साम्राज्यावर आणि जनतेवर अनेक आपत्ती लादल्या. त्याच्या क्रौर्याने लोक त्रस्त होऊन गेले होते. गुप्त साम्राज्याला दुर्बल बनविण्यामध्ये हूणांनी बराच हातभार लावला. रोमन साम्राज्याप्रमाणेच गुप्त साम्राज्यालाही या लोकांनी मोठा धक्का दिला.

हूणांच्या बाह्य आक्रमणाबरोबरच साम्राज्यांतर्गत बऱ्याच कटकटी आणि कलह उत्तरकाळात बऱ्याच ठिकाणी निर्माण झाल्या होत्या. गुप्तांच्या काळात सामन्तशाही रूढ होती. समुद्रगुप्ताच्या काळापासून ठिक-ठिकाणी सामन्त होतेच. ते सम्राटाला सर्व प्रकारचे कर देत असत, विशेष प्रसंगी राजधानीत येऊन प्रणाम करीत असत आणि सम्राटांच्या आज्ञेचे पालनही करीत असत. तथापि हे सामन्त आपापल्या प्रदेशात एखाद्या राजाप्रमाणेच राज्य करीत असत. त्यांना विशेष प्रकारचे अधिकारही असत. त्यांना सैन्य ठेवण्याचा आणि आपल्या प्रदेशात कर वसूल करण्याचा अधिकार दिलेला होता. मात्र प्रतिवर्षी सम्राटाला ठराविक खंडणी त्यांना द्यावी लागत असे आणि युद्धाच्या प्रसंगी आपले सैन्य घेऊन सम्राटाच्या साहाय्याला जावे लागत असे.

मध्यवर्ती सत्तेचे केंद्र जसजसे दुर्बल होऊ लागले तसतसे प्रांतांतील सामन्त प्रबल बनू लागले. आपल्या सैन्याच्या बळावर त्यांनी स्वतंत्र

राज्याची स्थापना करण्यास सुरुवात केली. या सामन्तांप्रमाणेच राज्यपाल-पदावर असणाऱ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनीही आपापली सत्ताकेंद्रे निर्माण करण्यास सुरुवात केली होती. महत्त्वाकांक्षी राज्यपालांनी स्वतःला राजा म्हणून घोषित केले होते. अशा प्रकारे आपल्या विशेष अधिकारांचा दुरुपयोग या मंडळींनी करण्यास सुरुवात केली होती.

गुप्तवंशामध्ये अंतर्गत अथवा गृहकलह प्रारंभापासूनच होत असल्याचे दिसते. वारसासंबंधी काही निश्चित नियम नव्हते. सम्राट कोणाही राज-कुमाराला आपला वारस म्हणून नियुक्त करीत असे. त्यामुळे अन्य राज-पुत्रांमध्ये द्वेषमत्सराची भावना जागृत होत असे. समुद्रगुप्ताला ज्यावेळी पहिल्या चंद्रगुप्ताने आपला युवराज म्हणून घोषित केले त्याच वेळी त्याचे इतर बंधू नाराज बनले होते, उदास झाले होते आणि मत्सरापोटी त्यांच्या मनात बंडाची किंवा बदला घेण्याची भावना निर्माण झाली होती. आणि त्यानुसार समुद्रगुप्त राज्यावर येताच त्याच्या भावांनी त्याच्या-विरुद्ध बंड केले होते. समुद्रगुप्ताने हे बंड आपल्या बाहुबलाने मोडून काढले होते. कुमारगुप्ताच्या मृत्यूनंतर स्कन्धगुप्तालाही अशाच प्रकारे राज्यावर येताच गृहकलहाला तोंड द्यावे लागले होते. बुधगुप्ताच्यानंतर गुप्त राजवंशामध्ये गृहकलहाला आणखीनच जोर चढलेला होता. गुप्त साम्राज्यामध्ये फूट पडून त्याच्या तीन शाखा निर्माण झाल्या होत्या. या फाटाफुटीमुळेही गुप्त साम्राज्याची शक्ती बरीच क्षीण होऊन गेली होती. स्कन्धगुप्ताच्या काळापर्यंत गुप्त वंशातील राजे साम्राज्यवादी नीतीचे समर्थक होते आणि पुरातन वैदिक धर्माचे व कर्मकाण्डाचे पुरस्कर्ते होते. त्यांनी साम्राज्य वाढविण्याकडे दृष्टी ठेवल्यामुळे युद्ध, हिंसा किंवा रक्तपात हे निषिद्ध मानले नव्हते. समुद्रगुप्त 'सर्वराजोच्छेता', 'धरणिबन्ध' या आदर्शांचा पुरस्कर्ता होता. चंद्रगुप्त विक्रमादित्य 'कृत्स्नपृथ्वीजय' तर स्कन्धगुप्त 'समग्रअवनिविजय' या ध्येयाचे

उत्कट समर्थक होते. त्यांनी आपल्या सैनिक पदांवर बहुधा शैव अधिकाऱ्यांची नियुक्ती केलेली होती. पहिल्या कुमारगुप्ताचा सेनापती म्हणजे महाबलाध्यक्ष पृथिवीषेण हा शिवाचा भक्त होता. चंद्रगुप्त-विक्रमादित्याचा परराष्ट्रमंत्री वीरसेन हा शैव होता. स्कन्धगुप्ताच्या पश्चात् बुधगुप्त, तथागतगुप्त, बालादित्य आणि व्रज अशा काही राजवंशांतील लोकांनी बौद्धधर्म स्वीकारला होता. त्यामुळे असे अनुमान आहे की, यांनी बुद्धाच्या शिकवणुकीनुसार अहिंसेच्या नीतीचे अवलंबन केले असावे आणि त्याचा परिणाम सैनिकशक्ती क्षीण होण्यात झाला असावा. सम्राट अशोकाच्या बाबतीतही अशा प्रकारचा निष्कर्ष काढण्यात येतो. मिहिरकुल या हूण राजाला बालादित्याने आईच्या आज्ञेनुसार याच भावनेने मुक्त केले होते परंतु त्याचे भयानक परिणाम पुढे भोगावे लागले. ह्यूएनत्संगने असे म्हटले आहे की, बौद्धधर्मी गुप्त राजांच्या दयाळूपणाबद्दल आणि उदारपणाबद्दल जेवढा लोकांना आदर वाटत असे तेवढा त्यांच्या शौर्याबद्दल आणि पराक्रमाबद्दल वाटत नसे. अखेरच्या गुप्तराजांच्या शिथिल राजनीतीचा फायदा वर्धन, मौखरी, उत्तरगुप्त आणि गौर यांनीही उठविला होता.

गुप्तसम्राटांची शासनव्यवस्था उत्तम प्रकारची सुदृढ होती. परंतु उत्तरकालात तिच्यामध्ये अनेक प्रकारचे दोष आलेले होते. राज्यपाल आणि विषयपती यांना नको तेवढे अधिकार बहाल केलेले होते. प्रांतपती 'नृप' आणि 'उपरिकमहाराज' अशा प्रकारच्या उच्च राजकीय पदव्या धारण करू शकत होते. राजकीय सोयी आणि अधिकार यामुळे यांची व्यक्तिगत महत्त्वाकांक्षा वाढली आणि त्यांना स्वतंत्र बनण्यासाठी बंड करावेसे वाटू लागले. अनुकूल संधी मिळताच त्यांनी सम्राटाविरुद्ध उठाव केले. उच्चाधिकाऱ्यांचे पद आनुवंशिक होते. त्यामुळे कधी कधी अयोग्य व्यक्तीदेखील त्या उच्च पदावर बसत असत. त्यामुळे राज्यात

भ्रष्टाचार माजत असे.

या काळात अग्रहार-दान देण्याची प्रथा प्रचलित होती. अशा प्रकारची दाने गुप्त राजांनी सर्वांत अधिक दिलेली आहेत. दानाच्या नियमानुसार आणि धार्मिक मान्यतेनुसार ज्याला दान मिळाले तो आणि त्याचे वंशज त्या भूमीचा भोग अनंत काळपर्यंत घेऊ शकत होते. दान देणारा सम्राट अथवा त्याचा कोणीही वारस हे अधिकार काढून घेऊ शकत नव्हता. त्यामुळे स्थानिक लोक राजाऐवजी या दानग्राही व्यक्तीलाच कर देऊ लागले होते. अशा प्रकारची सवलत राजकीयदृष्टया हानिकारक ठरली. प्राचीन भारतातील अग्रहार-दानाची ही प्रथा मध्य-कालीन जहागीरदारी प्रथेप्रमाणे घातक ठरली.

गुप्त साम्राज्याच्या अध:पतनाला अशी विविध कारणे होती. त्यात यशोधर्मन याचा अभ्युदय हेही एक कारण होते. यशोधर्मन अथवा यशोधर्मा हा औलिकर वंशातील एक राजा होता. याचे राज्य माळव्या-तील मंदसौर अथवा दशपूर या भागावर होते. तेथे त्याचे काही शिलालेखही उपलब्ध झालेले आहेत. जयवर्मा, सिंहवर्मा, नरवर्मा, विश्ववर्मा, बन्धुवर्मा आणि यशोधर्मा अशी त्यांची वंशावळ आहे. पहिल्या कुमारगुप्ताचा बन्धुवर्मा हा मांडलिक होता. तो दशपूर येथे राज्य करीत होता. याला 'जनेन्द्र' अशी उपाधी होती. ज्या प्रदेशावर गुप्त राजांनाही शासन करता आले नव्हते त्या प्रदेशावर यशोधर्माने आपले आधिपत्य स्थापन केले होते. राजांच्या मुकुटावर विलास करणारी हूण अधिपतींची राजाज्ञादेखील अशा प्रदेशात प्रवेश करण्यास असमर्थ ठरली होती. पूर्व समुद्रापासून ते लौहित्य नदीपर्यंत आणि पश्चिम समुद्रापासून ते हिमालयापर्यंत याने विजययात्रा केली होती. हूण सम्राट मिहिरकुल याने बहुमूल्य अशा नजराण्यासह याचे चरणवंदन केले होते. अशी यशोधर्माविषयीची माहिती मंदसौर

येथील शिलालेखामध्ये दिलेली आहे. यशोधर्मा हा शिवाचा उपासक होता. मंदसौरजवळ यशोधर्माने उभारलेले दोन विजयस्तंभ आहेत. मिहिरकुल या हूण राजाशी झालेल्या युद्धात यशोधर्माने प्रचंड विजय मिळविला होता. त्या विजयाचे चिन्ह म्हणूनच हे विजयाचे स्तंभ उभारले होते. अखेरच्या गुप्तसम्राटांची सत्ता दुबळी झाली तेव्हा यशोधर्माने आपली स्वतंत्र सत्ता प्रस्थापित केली आणि मिहिरकुलाचा पराभव करून हूणांच्या मगरमिठीतून उत्तरभारताला मुक्त केले. यशोधर्मा यालाच विष्णू-वर्धन असे दुसरे एक नाव होते. 'राजाधिराज' आणि 'परमेश्वर' अशा गौरवपूर्ण पदव्याही त्याला होत्या.

मिहिरकुल हा हूण वंशातील तोरमाण या राजाचा मुलगा होता. मिहिरकुलाविषयीची माहिती कल्हणाच्या राजतरंगिणीमध्ये आणि ह्युएन-त्संगच्या प्रवासवर्णनामध्ये आलेली आहे. शिवाय तत्कालीन नाणी आणि शिलालेख इत्यादीवरूनही त्याची माहिती मिळते. मिहिरकुलाची राजधानी पंजाबमधील शाकल म्हणजेच सियालकोट येथे होती. हा मोठा शिवभक्त होता. मंदसौर येथील यशोधर्माच्या शिलालेखात मिहिरकुलाने शिवाखेरीज अन्य कोणापुढेही मान वाकविली नाही असे म्हटलेले आहे. काश्मिरातील श्रीनगरमध्ये याने एक शिवमंदिर बांधले होते आणि त्याला 'महिरेश्वर' असे नाव दिले होते. याच्या मुद्रांवर एका बाजूला 'जयतु वृषा' आणि दुसऱ्या बाजूला 'जयतु वृषध्वज' असे लिहिलेले आहे. त्रिशूल, नंदी आणि छत्र ही चिन्हेही कोरलेली आढळतात. प्रारंभी मिहिरकुल हा कट्टर बौद्धधर्मी होता. परंतु नंतर त्याने बौद्धधर्माचा त्याग केला. इतकेच नव्हे तर तो त्याचा शत्रू बनला आणि त्याने गांधार देशातील १६०० बौद्ध मठांचा आणि स्तूपांचा विध्वंस केला, लक्षावधी बौद्धांना कापून काढले.

यशोधर्माने मिहिरकुलाच्या साम्राज्यसत्तेला त्याचा पराभव करून

पायबंद घातला. नरसिंहगुप्त या राजानेही याचा पराभव केला होता. त्यामुळे उत्तर भारतातील राजस्थान, माळवा इत्यादी प्रदेशावरील याची सत्ता नष्ट झाली. परंतु काश्मिर व गांधार या प्रदेशावर मात्र त्याचेच राज्य होते.

यशोधर्माच्या पराक्रमाविषयी लिहिताना स्वातंत्र्यवीर सावरकरांनी म्हटले आहे की, "मगधातील गुप्त साम्राज्यपद पुरगुप्तासारख्या कुपात्र नि दुबळ्या पुरुषाच्या हाती जाताच त्याचे आधिपत्य कोणीही मानीनासे झाले. गुप्त साम्राज्याचे मांडलिक असलेले बहुतेक राजे नि प्रदेश स्वतंत्रपणे राज्य करू लागले. यद्यपि त्या निरनिराळ्या स्वतंत्र भारतीय राज्यांतील प्रत्येकाला म्लेंच्छ हूणांच्या माळव्यापर्यंत वाढलेल्या राजसत्तेची भीती वाटत होती. प्रत्यक्ष उज्जयिनीला विक्रमादित्याच्या सिंहासनावर हा मिहिरकुलासारखा म्लेंच्छ राक्षस बसत असलेला पाहून बहुतेकांच्या अंगाची जरी लाही लाही होत असली आणि हूणांचा उच्छेद कधी होईल अशी प्रत्येक स्वराष्ट्राभिमानी वैदिक भारतीयाला जरी सचिंत उत्कंठा लागली होती, तरी हूणांविरुद्ध स्वतः व एकट्याने चढाई करण्याची त्या फुटकळ राज्यांतील एकालाही छाती होईना. तो प्रश्नच कोणी काढू धजेना.

"अशा वेळी तोच कठीण प्रश्न सोडविण्याची प्रकट प्रतिज्ञा करून एक साहसी वीरपुरुष पुढे आला. तो कोणी महाराजाधिराज नव्हता. तो महाराजही नव्हता. तो होता मालव प्रांतातील यशोधर्म नावाचा एक सापेक्षतः लहानसा राजा. परंतु त्याची महत्त्वाकांक्षा, राष्ट्राभिमान नि साहस हे म्लेंच्छांच्या 'राजाधिराज' म्हणून मिरविणाऱ्या बलाढ्य मिहिरकुलाला उज्जयिनीच्या सिंहासनावरून खाली ओढून हूणांचा निःपात करण्यासाठी स्वतः रणांगणात उतरण्याइतके उत्तुंग होते!

"त्याने प्रथमतः आजूबाजूच्या स्वतंत्र अशा बहुतेक भारतीय राजांना

हूणांविरुद्ध युद्ध करण्यासाठी एका संयुक्त योजनेत संघटित केले. या संयुक्त युद्धयोजनेस मगधाच्या बालादित्य राजानेही उचलून धरले. तेव्हा यशोधर्म राजाच्या नेतृत्वाखाली त्या सर्व राजांनी हूणांविरुद्ध चहूबाजूंनी उठावणी केली. जे साहस त्यावेळचा कोणताही एकएकटा राजा करू धजत नव्हता ते साहस करण्याचा आवेश ह्या संयुक्त भारतीय सैन्यात उत्पन्न होऊन हूणांच्या प्रबळ सैन्याची रणांगणात लांडगेतोड झाली.

"शेवटी सेनापती यशोधर्म याने आपल्या हाताखालील सैन्यासह हूणांचा राजा जो मिहिरकुल त्याच्या मुख्य सैन्यावरच चाल केली. या दोन्ही सैन्यांची गाठ मंदसौर येथे किंवा कोरूर येथे इ. स. ५२८ च्या आसपास पडली. त्यांच्यामध्ये झालेल्या हटातटाच्या लढाईत भारतीय सैन्याच्या माऱ्यापुढे हूणांच्या सैन्याची फळी फुटून त्याची दाणादाण उडाली आणि आजवर कर्दनकाळासारखा मातलेला त्यांचा राजा जो मिहिरकुल तो स्वतः जिवंत पकडला जाऊन विजयी सेनापती जो यशोधर्म त्याच्या हाती सापडला.

"राजा यशोधर्म याच्या पराक्रमाने मिळविलेल्या हूणांवरील ह्या अभूतपूर्व विजयाच्या दुंदुभी साऱ्या भारतवर्षभर निनादू लागल्या. हूण जातीने नि स्वतः मिहिरकुलाने भारतीयांवर केलेल्या आजवरच्या अत्याचारांचा भारतीय सूड उगविण्यासाठी आणि त्याच्या पापाचे त्याला प्रायश्चित्त देण्यासाठी यशोधर्म राजाने पाडाव केलेला हूण राजा जो मिहिरकुल ह्याचा शिरच्छेद करण्याची आज्ञा दिली.

"परंतु दुष्ट मिहिरकुलाला ठार मारण्याची आज्ञा राजा यशोधर्म ह्याने दिली आहे हे कळताच त्या संयुक्त आघाडीतील एक घटक असलेला मगधाचा राजा जो बालादित्य ह्याने मिहिरकुलाला ठार न मारता आपल्या स्वाधीन करावे असा अत्याग्रह धरला. त्यामुळे बालादित्यास दुखवू नये

म्हणून त्या अत्याचारी हूण राजाला राजा यशोधर्म याने मिहिरकुलाला स्वतः ठार न मारता बालादित्याच्या हाती सोपविले. मिहिरकुलाचे हस्ते काही स्वार्थ साधण्याच्या गुप्त अटीवर असो किंवा वधार्ह राष्ट्रशत्रूलाही परत जीवदान देणे, सापाला दूध पाजणे हेच अलौकिक औदार्याचे कृत्य होय असे मानण्याचे जे दुष्ट व्यसन आपल्या भारतीयांच्या हाडीमासी खिळलेले आहे, तशा राष्ट्रघातकी औदार्यापायी असो पण बालादित्याने त्या राष्ट्रशत्रू नि दुष्टात्मा असलेल्या मिहिरकुलाला जीवदान दिले, इतकेच नव्हे तर त्याला सन्मानपूर्वक वायव्येकडे उरलेल्या हूण राज्यात जाण्याची मोकळीक दिली ! जशी अगदी अर्वाचीन काळी पृथ्वीराजाने महंमद घोरीला दिली."

काही झाले तरी सुमारे ३०० वर्षे गुप्त सम्राटांनी राज्य करून भारतीय इतिहासाची पाने उज्ज्वल करून ठेवली आहेत यात शंका नाही.

□



# सुवर्णकालाचे दर्शन : १

भारतीय इतिहासामध्ये गुप्त साम्राज्याच्या काळाला सुवर्णयुग असे म्हटले जाते. कारण या काळातच भारतामधील राष्ट्रीय एकता आकाराला आली. गुप्तांची राज्यव्यवस्था लोकहिताच्या दृष्टीने सुव्यवस्थित आणि कल्याणकारी होती. बहुतेक गुप्तसम्राट हे जरी वैदिक धर्माचे अभिमानी होते तरी इतर धर्मांकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन उदार आणि सहिष्णुतेचा होता. या काळात विदेशांशी संबंध आला आणि व्यापार–उद्योगात बरीच प्रगती झाली. त्यामुळे भारतीय जनतेच्या जीवनामध्ये आर्थिक सुबत्ताही आली. याच कालावधीमध्ये विविध कलांचा बराच विकास झाला, विज्ञानाच्या क्षेत्रात प्रगती झाली आणि साहित्य बहराला आले. गुप्तसम्राटांच्या सुदृढ शासनव्यवस्थेमुळे आणि रसिक व धार्मिक दृष्टीकोनामुळे देशामध्ये बराच काळ शांती आणि सुव्यवस्था नांदली. कला आणि साहित्य यांच्या विकासासाठी देशात शांती आणि

सुव्यवस्थेची नितांत गरज असते. गुप्तकालामध्ये प्रदीर्घ काळपर्यंत असे वातावरण लाभल्यामुळेच विविध प्रकारच्या कलांचा उत्कर्ष झाला. भारतीय स्थापत्यकला, मूर्ती कला आणि चित्रकला यांतील उच्चतम असे नमुने या काळामध्ये निर्माण झाले. मंदिर बांधण्याच्या कलेचा जन्म याच काळात झाला असे काही विद्वानांचे मत आहे.

गुप्तकालीन राजप्रासाद अथवा भवनांचे अवशेष आज उपलब्ध नाहीत. तत्कालीन साहित्यामध्ये मात्र विशाल प्रासादांचे उल्लेख आलेले आहेत. गुप्तकालातील अनेक मंदिरे, बौद्धविहार, स्तूप आणि गुहा यांचे भग्नावशेष मात्र आजही कोठे कोठे पहावयास मिळतात.

गुप्त सम्राटांनी पाषाणांची आणि विटांची अशी दोन्ही प्रकारची मंदिरे बांधली होती. देवगढ येथील दशावतार मंदिर हे गुप्तकालातील सर्वांत अधिक प्रसिद्ध आणि कलापूर्ण मंदिर आहे. देवगढ हे गाव झाशी जिल्ह्यात आहे. उंच चबुतऱ्यावर बांधलेले हे मंदिर आजही आपले पुरातन वैभव घेऊन उभे आहे. मंदिरात शेषावर शयन करीत असलेली भगवान विष्णूची मूर्ती आहे. मंदिराच्या गर्भगृहाला चार दरवाजे आहेत. मंदिराच्या खांबावर विविध प्रकारच्या मूर्ती खोदलेल्या असून त्या कलेच्या दृष्टीने उच्च प्रतीच्या आहेत. मंदिरावरचे शिखर हे देखील तत्कालीन मंदिराच्या शिखरांहून वेगळे व कलापूर्ण असे आहे. मंदिराच्या भिंतींवरही विविध प्रकारच्या कलाकृतीचे नमुने पाहावयास मिळतात.

कानपूर जवळील भितर नावाच्या गावात विटांचे बांधलेले विशाल असे गुप्तकालीन मंदिर आहे. मंदिरांच्या भिंतीवर नाना प्रकारची चित्रे रेखाटलेली आहेत. काही ठिकाणी सुंदर मूर्तीदेखील दिसतात.

मध्यप्रदेशातील तिगवा येथील मंदिर एका टेकडीवर बांधलेले आहे. मंदिराच्या चौकटीवर उत्कृष्ट नक्षीकाम केलेले आढळते. भूमरा येथील मंदिर भग्नावस्थेत असले तरी गर्भागारातील शिवलिंग अत्यंत सुंदर आहे.

मंदिराच्या स्तंभावर हिंदू देवतांच्या मूर्ती कोरलेल्या आहेत. विजापूर जिल्ह्यातील आइहोल नावाच्या ठिकाणी गुप्तकालीन प्राचीन मंदिर असून मंदिराच्या महाद्वारावर गंगा आणि यमुना यांच्या मूर्ती कोरलेल्या आहेत. याशिवाय आसाम इत्यादी प्रदेशातही गुप्तकालातील मंदिरे होती.

मंदिरांच्या व्यतिरिक्त अनेक गुहा, चैत्य आणि विहार यांचीही निर्मिती झाली. सारनाथ येथील धमेख स्तूप गुप्तकाळातीलच आहे. आतून हा स्तूप अत्यंत कलापूर्ण आहे. बाहेरील दगडी भागावर अनेक प्रकारची चित्रे आणि मूर्ती बनवलेल्या आहेत. उत्कृष्ट असे नक्षीकामही आढळते. भिलसाजवळ उदयगिरी नावाने प्रसिद्ध असलेल्या गुंफा आहेत. कलेच्या दृष्टीने त्या अत्यंत उत्कृष्ट आणि महत्त्वपूर्ण आहेत. गुंफांमध्ये भगवान विष्णूच्या वराह अवताराची विशाल प्रतिमा आहे. गुंफेच्या द्वारावर आणि स्तंभावर अनेक प्रकारच्या मूर्ती कोरलेल्या आहेत. ह्या मूर्ती पौराणिक आणि देवदेवतांच्या आहेत.

अजंठा येथील गुंफांपैकी कमीत कमी तीन गुंफा तरी या काळात निर्माण झालेल्या आहेत. विशालकाय अशा डोंगरात कोरून या गुंफा तयार केलेल्या आहेत. क्रमांक १६ ची गुंफा गुप्तकाळातील असून तिची लांबी-रुंदी ६५ फूट आहे. तिच्यात १६ स्तंभ आणि निवासासाठी तयार केलेल्या सहा खोल्या आहेत. भिंतींवर अत्यंत उत्कृष्ट अशी चित्रे रेखलेली आहेत.

गुप्तकाळामध्ये सम्राट अशोकाप्रमाणेच अनेक पाषाणस्तंभ निर्माण करण्यात आले होते. सीमा निर्धारण अथवा विजयाची स्मृती ह्या उद्देशाने असेच स्तंभ उभारले जात असत. काही स्तंभ धार्मिक हेतूनेही उभारलेले होते. कहोम, एरण, गाजिपूर, भिलसद इत्यादी ठिकाणी हे असे स्तंभ असून काही स्तंभांवर गरुड अथवा सिंह यांच्या मूर्ती बनविलेल्या

आहेत.

गुप्तकाळात मूर्तीकलेत खूपच प्रगती झालेली होती, किंबहुना उत्कृष्ट तऱ्हेची मूर्तीकला ही गुप्तकालाची देणगी आहे असेही म्हटले जाते. कुशाणकालात विविध प्रकारच्या शैली जन्मास आल्या. परंतु गुप्तकालामध्ये या विविध प्रकारच्या शैलींचा समन्वय करून एक नवीन राष्ट्रीय शैली जन्मास आली. गुप्तकालीन मूर्तीकलेचे वैशिष्ट्य म्हणजे भौतिकता आणि अध्यात्मिकता यांचा सुंदर समन्वय तिच्यात झालेला आढळतो. भगवान बुद्धापासून ते शिव, विष्णू, देवी इत्यादी देवदेवतांच्या जेवढ्या सुंदर मूर्तीं या काळात निर्माण झाल्या तेवढ्या सुंदर मूर्ती क्वचितच अन्य काळात निर्माण झाल्या असतील. या काळातील कलावंत दगड आणि धातू यांमध्ये प्राण ओतणारे होते. हे निर्जीव पदार्थही त्यांच्या कलेने सजीव होऊन जात असत. पाटलीपुत्र सारनाथ आणि मथुरा या तीन प्रमुख केंद्रांमध्ये या काळातील मूर्तींची जडणघडण होत असे.

सारनाथ येथील भगवान बुद्धाची मूर्तीं पद्मासन घातलेली आहे. भगवान बुद्ध धर्मचक्र परिवर्तन करीत आहे. बुद्धांच्या मुखमंडलावर अपूर्व शांती, प्रभा, कोमलता आणि गांभीर्य दिसून येते. मूर्तींच्या अंगप्रत्यंगातून सुडौलपणा आणि सौंदर्य प्रकट होते. भगवान बुद्धाच्या चोहोबाजूला अलंकृत असे प्रभामंडल आहे. या प्रभामंडलाच्या दोन्ही बाजूला दोन देवतांच्या मूर्तीं आहेत. त्यांचे खादे नाजूक वस्त्रांनी झाकलेले आहेत. आणि ती वस्त्रे त्यांच्या पायांपर्यंत दाखविलेली आहेत. भगवान बुद्धाच्या बैठकीच्या मध्यभागी धर्मचक्र आणि दोन मृग दाखविलेले आहेत.

७॥ फूट उंचीची भगवान बुद्धांची तांब्याची मूर्तीं बिहारमधील सुलतानगंज येथे होती. भगवान बुद्धांचा हस्त अभयमुद्रेमध्ये थोडा पुढे आलेला दाखवला असून त्यांच्या मुखावरील भाव अत्यंत शांत आणि

गंभीर असा आहे. करुणा आणि दिव्यता यांचा सुंदर समन्वय मुद्रेवर दिसून येतो. एवढी प्रचंड आणि सुंदर ताम्रमूर्ती गुप्तकाळात निर्माण केलेली होती त्यावरून त्या काळातील धातूविज्ञानाची प्रगती दिसून येते.

मथुरा येथील भगवान बुद्धाची उभी मूर्ती ७ फूट २॥ इंच उंचीची आहे. डोक्यावर अलंकृत प्रभामंडल आहे. वस्त्रांकन अत्यंत नाजूक आहे. शरीराचा प्रत्येक भाग रेखीव आहे. भगवान बुद्धाची मुद्रा शांत आणि करुणामय आहे. याशिवाय अन्य ठिकाणीही या काळात बनविलेल्या मूर्ती आढळून येतात.

गुप्त काळातील बुद्ध जीवनावरील अनेक प्रस्तरफलक उपलब्ध झालेले आहेत. सारनाथ येथील प्रस्तर खंडावर भगवान बुद्धांचा जन्म, ज्ञानप्राप्ती, धर्मचक्रपरिवर्तन, निर्वाण इत्यादी घटना मोठ्या कलापूर्ण रीतीने कोरलेल्या आहेत.

हिंदूंच्या देवदेवतांच्या विविध प्रकारच्या मूर्तींही बऱ्याच आढळतात. कौशाम्बि येथील सूर्यमूर्ती हा शिल्पकलेचा एक उत्कृष्ट नमुना आहे. काशी येथील मोरावर बसलेल्या कार्तिकेयाची मूर्ती सुंदर आहे. कार्तिकेयाच्या मस्तकावर मुकुट, कानांमध्ये कुंडले आणि गळ्यात हार घातलेला आहे. मुखावर गांभीर्याचा भाव दिसतो. उदयगिरी येथील भव्य वराहमूर्ती, तशीच देवगढ येथील शेषशायी विष्णूची मूर्ती, अनेक शिवमूर्ती तत्कालीन मूर्तीकलेतील कौशल्याची साक्ष देतात.

गुप्त कालातील काही जैन मूर्तीही उपलब्ध झालेल्या आहेत. वर्धमान महावीर यांची पद्मासन घातलेली मूर्ती मथुरेत आहे. ही मूर्ती कुमारगुप्ताच्या काळातील आहे. गोरखपूर जिल्ह्यातील काही जैन मूर्ती उपलब्ध झालेल्या आहेत.

पक्क्या मातीच्या मूर्तीही या काळात बनविल्या जात असत. पशु-

पक्षी, स्त्रीपुरुष इत्यादी विविध प्रकारच्या मूर्ती मातीच्या केलेल्या होत्या. भारतातील गांधार कलेवर ग्रीक मूर्तीकलेचा प्रभाव पडलेला होता. गुप्त-काळामध्ये या कलेतील भारतीयत्व जपण्याचा विशेष प्रयत्न झाला. परकीय प्रभावापासून गुप्तकालीन शिल्पकला स्वतंत्र राहिली. बाह्य सौंदर्यापेक्षा आंतरिक सौंदर्याकडे या काळातील कलावंतांनी अधिक लक्ष दिल्याचे दिसते. अनेक मूर्तींच्या मुखावर भौतिक सौंदर्यापेक्षा आंतरिक शांती, ओज, आध्यात्मिक आनंद यांची झलक पाहावयास मिळते. कुरळे केस, अलंकृत प्रभामंडल, नाजूक वस्त्रांकन आणि सौंदर्य व आदर्श यांचा सुंदर समन्वय तसेच स्वाभाविकता व मुद्रांची विविधता हे गुप्त-कालीन मूर्तीकलेमधील वेगळे वैशिष्ट्य आहे.

या काळात चित्रकलेचीही पुष्कळ प्रगती झालेली होती. महाराष्ट्रातील अजंठा येथील चित्रकला किंवा मध्यभारतातील बाघ गुंफांमधील चित्रकला याची साक्ष देतात. अजंठ्याची चित्रकला ही अतीव सुंदर व प्रेक्षणीय असून जगप्रसिद्ध आहे. भगवान बुद्धाच्या जीवनातील घटनांचे चित्रण तसेच अनेक जातक कथा आणि पशुपक्षी, वृक्षवेली, फुले, इत्यादींचे उत्कृष्ट चित्रण येथील भिंतींवर आणि छतांवर केलेले आहे. मानवी भावनांचे सुंदर प्रकटीकरण तेथील स्त्रीपुरुषांच्या चित्रांमधून दिसून येते. त्यांच्या गुंफावरील क्रोध, हर्ष, उत्साह, करुणा, लज्जा इत्यादी भाव अतिशय कलापूर्ण रीतीने रेखलेले आहेत. मानवी जीवनाबरोबरच निसर्ग-जीवनही कलाकारांनी रंगविलेले आहे. चेतन आणि अचेतन या दोन्हीही-विषयी या काळातील चित्रकारांना प्रेम आणि सहानुभूती होती. अजंठा येथील चित्रांमध्ये मोहरलेले वृक्ष, झुळझुळणारे निर्झर आणि मुक्तपणाने फिरणारे पशुपक्षी चित्रित केलेले आहेत. ह्यावरून त्यांच्या निसर्गप्रेमा-बरोबरच त्यांचे बारीक निरीक्षण आणि अवलोकनही दिसून येते.


गुप्तकाळातील राजांच्या विविध तऱ्हेच्या संपन्न अशा सुवर्ण, रजत

आणि ताम्र यांच्या मुद्रादेखील तत्कालीन प्रगत कलेची साक्ष देतात. या मुद्रांवरही अनेक तऱ्हेच्या मूर्ती व चिन्हे रेखलेली आहेत.

गुप्तसम्राट संगीत-वादनाचे प्रेमी होते. समुद्रगुप्त वीणावादनात प्रवीण होता. नारद आणि तुम्बर यांच्याहूनही तो उच्च प्रतीचा संगीतकार होता अशी त्याची प्रशस्ती हरिशेण कवीने शिलालेखात केलेली आहे. त्या काळातील नाटकांमधून संगीत कलेला स्थान मिळालेले आहे. स्त्रिया नृत्य-गायनात निपूण होत्या. बाघ येथील चित्रांमध्ये स्त्रिया मृदुंग, झांज इत्यादी वाजवताना दाखवलेले आहे. कालिदासाच्या रचनेतूनही विविध वाद्यांचे वर्णन आलेले आहे. सारनाथ येथील शिल्पात नृत्य करणाऱ्या स्त्रीची मूर्ती कोरलेली आहे. नाटकांचे प्रयोग या काळी विविध उत्सवप्रसंगी होत असत. त्यामुळे अभिनयकलेचा विकासही बराच झालेला होता.

□

का. क्र. २२६३ २२५७०
विषय ग्रा.प.



## सुवर्णकालाचे दर्शन : २

गुप्तकालामध्ये साहित्याच्या क्षेत्रातही सुवर्णयुग अवतरलेले होते. ललित साहित्य, शास्त्रीय साहित्य आणि धार्मिक साहित्य अशा साहित्याच्या शाखा बहरलेल्या होत्या.

महाकवी कालिदास हा या काळातील भारतीय साहित्याचा अभिमान-बिंदूच ठरला. आजवर अनेक राजे महाराजे आले आणि गेले. अनेक राजवटी उदयाला आल्या आणि गेल्या परंतु कालिदासाचे स्थान मात्र चिरंतन अटळच राहिलेले आहे.

गुप्तकाळामध्ये प्रसिद्ध अशा कवींप्रमाणेच काही अल्पप्रसिद्ध असे कवीही होऊन गेले. या कवींच्या रचना ग्रंथरूपाने उपलब्ध नाहीत. परंतु शिलालेखांच्या द्वारा त्यांच्या कवित्वाची साक्ष मिळते. हरिषेण, शाब, वत्सभट्टी, वासुल या कवींच्या रचना अशा प्रकारे उपलब्ध आहेत. हरिषेण हा समुद्रगुप्ताच्या वेळी महादण्डनायक होता. प्रयाग येथील

लेख त्याने लिहिलेला आहे. शाब हा चंद्रगुप्त-विक्रमादित्याचा सान्धिविग्रहिक अमात्य होता. वीरसेन हे त्याचे कुलनाम होते. उदयगिरी येथे त्याचा एक लेख आहे. वत्सभट्टी याचा स्तंभलेख मंदसौर येथे आहे. वासुल हा कवी यशोधर्मन् याच्या काळात होऊन गेला. मंदसौर येथील प्रशस्तीलेख याने रचलेला आहे.

संस्कृत साहित्यात विख्यात झालेल्या कवींमध्ये भारवी हा श्रेष्ठ प्रतीचा महाकवी होता. याने रचलेले 'किरातार्जुनीय' नावाचे महाकाव्य प्रसिद्ध आहे. 'अवंती सुंदरी कथा' नावाच्या ग्रंथामध्ये भारवी या कवीविषयी माहिती दिली आहे. भारताच्या वायव्येकडे आनंदपूर हे याचे मूळ गाव. पुढे अचलपूर येथे त्याचे पूर्वज स्थायिक झाले. नारायणस्वामी हे याच्या वडिलांचे नाव होते आणि दामोदर हे याचे नाव होते. हाच पुढे भारवी या नावाने विख्यात झाला. याची आणि विष्णुवर्धन राजाची मैत्री होती. राजाबरोबर हा एकदा शिकारीला गेला होता. त्यावेळी नाइलाजाने याला अभक्ष्यभक्षण करावे लागले. या घडलेल्या पातकामुळे तो अस्वस्थ बनला आणि शिकारीहून परतल्यावर घरी न जाता तीर्थयात्रेसाठी म्हणून निघून गेला. तीर्थयात्रा करीत हिंडत असताना दुर्विनित नावाच्या गंगराज घराण्यातील राजाशी त्याचा परिचय झाला. तो या राजाजवळ काही दिवस राहिला. एकदा त्याने कांची नगरीत सिंहविष्णू नावाच्या एका पल्लव राजाची स्तुती गाणारी एक आर्या लिहिली. ती एका गायकाच्या हाती लागली. गायकाने सिंहविष्णूच्या दरबारात जाऊन ती राजाला ऐकविली. राजा प्रसन्न झाला आणि त्याने भारवीला आपला राजकवी म्हणून दरबारात ठेवून घेतले.

भारवी आपल्या काव्यानंदात सदैव दंग असे. त्यामुळे प्रपंचात त्याचे बरेच हाल चालले होते. दारिद्र्याला कंटाळून एकदा त्याची पत्नी त्याला म्हणाली, 'एवढ्या कविता लिहिता त्याने काय पोट भरते ? चार दिडक्या

तरी मिळवून आणा.' भारवीने, 'कोणतेही काम अविचारे करू नये. कारण अविचार हे सर्व अनर्थांचे मूळ आहे. विवेकी पुरुषाच्या गुणांवर मोहित होऊन लक्ष्मी त्याला आपण होऊनच वरते.' अशा अर्थाचा एक श्लोक पत्नीला देऊन म्हटले, 'हा श्लोक एक लक्ष मुद्रांना विकून टाक आणि घरातील दारिद्र्य हाकलून दे.' तो श्लोक घेऊन भारवीची पत्नी एका सावकाराकडे गेली. त्याला तो श्लोक फारच आवडला आणि त्याने तिला एक लक्ष मुद्रा देऊन विकत घेतला अशी एक आख्यायिका आहे. दुसरी एक आख्यायिका अशी आहे की, पत्नीचे त्राग्याचे बोलणे ऐकून भारवी घराबाहेर पडला. आणि असाच हिंडतफिरत चालला. जाता जाता तो एका वनात पोचला. तिथे एका सरोवराच्या काठी बसला असता त्याला एक श्लोक सुचला. तो त्याने कमलपत्रावर लिहून काढला. वरील आशयाचाच हा श्लोक होता. त्याच वेळी एक राजा त्या वनात मृगयेसाठी आलेला होता. त्याच्या दृष्टीस तो श्लोक पडला. राजाला तो श्लोक अतिशय आवडला म्हणून त्याने भारवीला आपल्या दरबारात बोलावले. दुसऱ्या दिवशी भारवी राजाकडे गेला. परंतु त्याची कळाहीन दैन्यावस्था पाहून द्वारपालाने त्याला प्रासादात प्रवेश करू दिला नाही.

भारवीचा तो श्लोक राजाने सुवर्णाक्षरांनी लिहून शयनगृहात लावला. असेच काही दिवस गेले. एकदा राजा मृगयेसाठी चार-आठ दिवस रानावनात गेला होता. मृगयेवरून मध्यरात्रीस तो प्रासादात परतला. त्यावेळी त्याला राणीच्या शेजारी एक तरुण झोपलेला आढळला. ते दृश्य पाहून राजा संतापला आणि दोघांनाही ठार मारण्याच्या उद्देशाने त्याने तलवार परजली. पण घाव घालणार तेवढ्यात तो श्लोक राजाच्या दृष्टीस पडला. राजाने राग आवरला आणि राणीला जागे करून त्या तरुणाबद्दल चौकशी केली. तेव्हा राणीने सांगितले की, 'तो आपला २० वर्षे

परागंदा असलेला बाळ आहे. कालच अकस्मात परत आला.' हे ऐकून राजाला फार आनंद झाला आणि राग आवरून विवेकाने वागल्यामुळेच पत्नी आणि पुत्र ही दोघे वाचली, हे त्याच्या लक्षात आले. त्याला त्या श्लोकाचे महत्त्व आणखीनच पटले. त्याने भारवीचा शोध केला आणि त्याला आपल्या दरबारात आणून ठेवले. भारवीचे दारिद्र्य संपले.

'किरातार्जुनीय' हे महाकाव्य भारवीने लिहिले. कालिदासाची जशी उपमा, दंडीचे जसे पदलालित्य तसेच भारवीचे अर्थगौरव याने नटलेले काव्य प्रसिद्ध आहे. संस्कृत महाकाव्यामध्ये आपल्या आगळ्या वेगळ्या शैलीने भारवीने एक नवीन प्रवृत्ती सुरू केली असे मानले जाते.

भट्टी नावाचा प्रसिद्ध महाकवीही याच काळात होऊन गेला. त्याने 'रावणवध' नावाचे महाकाव्य लिहिले होते. त्या काव्यालाच भट्टिकाव्य असे म्हटले जाते. या काव्यात २२ सर्ग, १६२४ श्लोक आहेत. भट्टी हा गुजराथमधल्या वल्लभी नगरीत राज्य करणाऱ्या श्रीधरसेन राजाच्या दरबारात होता. भट्टीला गुजराथचा आद्यकवी मानतात. हा साहित्य आणि व्याकरण या शास्त्रांचा महापंडित होता. भट्टिकाव्यात या दोन्ही शास्त्रांचे प्राचुर्य सर्वत्र आढळते. त्याने आपल्या या काव्याविषयी असे स्वतःच म्हटले आहे की, 'व्याकरणाचे चक्षू असलेल्या लोकांना हा काव्यप्रबंध दीपकासमान ज्ञानप्रदर्शक आहे. मात्र व्याकरण न शिकलेल्या लोकांना हा अंधाच्या हातातील आरशाप्रमाणे ठरेल.' अशा प्रकारची त्याची ही रचना असल्यामुळे तिला शास्त्रकाव्य असेच म्हटले जाते.

शूद्रक हा 'मृच्छकटिक' नाटकाचा कर्ता गुप्तकालातच झाला. मृच्छकटिक हे त्याचे नाटक सुप्रसिद्ध आहे. यात सात प्रकारच्या प्राकृत भाषांचा उपयोग केलेला आहे. भाषा आणि साहित्य या दृष्टीने हे नाटक जितके महत्त्वाचे आहे तितकेच ऐतिहासिक सामुग्रीच्या दृष्टीनेही समृद्ध आहे. यात राजा, ब्राह्मण, व्यापारी, पोलीस अधिकारी, वेश्या, कुंटीण,

जुगारी, चोर, धूर्त आणि दास इत्यादी समाजातील विविध स्तरांमधील लोकांचे वर्णन आलेले आहे. त्यावरून समाजस्थितीची कल्पना येते. या नाटकाचा नायक चारुदत्त हा उदार आणि धीरोदात्त अशा पुरुषाचा आदर्श आहे. शूद्रकाचे हे नाटक 'मृच्छकटिक' या नावानेच मराठीत अनुवादित झालेले आहे आणि ते आज अनेक वर्षे रंगभूमीवर गाजत आहे.

या काळातील आणखी एक प्रसिद्ध नाटककार म्हणजे विशाखदत्त होय. याने लिहिलेले 'मुद्राराक्षस' हे संस्कृत नाटक प्रसिद्ध आहे. हा वटेश्वरदत्त सामन्ताचा नातू आणि भास्करदत्त अथवा महारातपृथु याचा पुत्र होता. विशाखदत्ताने 'देवीचन्द्रगुप्तम्' ह्या नाटकाचीही रचना केली होती. हे नाटक ऐतिहासिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. ते पूर्ण स्वरूपात उपलब्ध नसून त्यातील काही अंश 'नाट्यदर्पण' नावाच्या ग्रंथात आलेला आहे. कौटिलीय अर्थशास्त्र आणि शुक्र नीति त्याचप्रमाणे न्याय आणि ज्योतिष या शास्त्रांचा विशाखदत्त हा महान पंडित होता. मुद्राराक्षस या नाटकातदेखील राजनीति हाच प्रमुख विषय आहे. वीर-रसाला या नाटकात प्राधान्य दिलेले आहे. चाणक्य आणि राक्षस या दोघांमधील राजकीय डावपेचांचे किंवा कूटनीतीचे उत्कृष्ट चित्रण या नाटकात केलेले आहे.

गुप्तकाळामध्ये धार्मिक साहित्याचीही निर्मिती बरीच झालेली होती. मनुस्मृतीच्या आधारावर याज्ञवल्क्य, नारद, कात्यायन आणि बृहस्पती यांनी भिन्नभिन्न स्मृतींची रचना केली. 'कामन्दक–नीतिसार' या नावाचा ग्रंथ कामन्दकाने लिहिला. महाभारताचे संपादन आणि पुराणांचे पुर्नलेखन या काळात झाले. हिंदू, जैन आणि बौद्ध या धर्मातील तात्त्विक ग्रंथनिर्मितीही या काळात झाली. ईश्वरकृष्णाने सांख्य–दर्शनावर 'सांख्य-कारिका' नावाची टीका लिहिली तर, वात्स्यायनाने न्यायसूत्रावर टीका

लिहिली. बौद्ध आचार्य वसुबंधू याने हीनयान आणि महायान या दोन्ही पंथांवर ग्रंथ लिहिले, त्याचप्रमाणे बौद्ध पंडित दीङ्-नाग याने 'प्रमाण-समुच्चय' आणि 'न्यायप्रवेश' ह्या तात्त्विक ग्रंथांची रचना केली. बुद्धघोषाने 'विसुद्धिमग्ग' आणि 'सुमंगल विलासिनी' हे ग्रंथ रचले. आचार्य सिद्धसेनगुप्त ह्या जैन दार्शनिकाने 'न्यायावतार' नावाचा ग्रंथ लिहिला. भद्रबाहु नावाचा एक प्रसिद्ध जैन भाष्यकारही या काळात होऊन गेला.

या काळात विज्ञानाच्या क्षेत्रातही आणि विशेषतः गणित, ज्योतिष आणि चिकित्साशास्त्र यांत खूपच प्रगती झालेली होती. आर्यभट्ट हा प्रसिद्ध गणिती या वेळी होऊन गेला. पाटलीपुत्र येथेच आर्यभट्टाचा जन्म झाला होता. याने लिहिलेले 'आर्यभटीय', 'दश-देशिका-सूत्र' आणि 'अर्याष्टशत' असे तीन ग्रंथ लिहिले. भारताच्या इतिहासात याने प्रथमतःच ज्योतिषशास्त्रापासून गणित वेगळे केले. यानेच ग्रहणामध्ये राहू आणि केतू यांचा काही संबंध नसून सूर्य अथवा चंद्र यांच्यावर पडलेल्या पृथ्वीच्या छायेचा तो परिणाम आहे हे सांगितले. तसेच पृथ्वी आपल्या आसावर फिरत फिरत सूर्याभोवती प्रदक्षिणा करते हेदेखील आर्यभट्टाने प्रथमतः भारतात सांगितले. आर्यभट्टाच्या कालगणनेच्या सिद्धान्तानुसार बनविण्यात आलेले पंचांग दक्षिण भारतात विशेष प्रचलित आहे.

आर्यभट्टाप्रमाणेच ब्रह्मगुप्त आणि वराहमिहिर हे प्रसिद्ध शास्त्रज्ञ गुप्त-काळामध्ये होऊन गेले. 'ब्रह्मसिद्धान्त' ह्या नावाचा ज्योतिषशास्त्रावरील महत्त्वाचा ग्रंथ ब्रह्मगुप्त याने लिहिला.

वराहमिहिर ह्या पंडिताने लघुजातक, बृहज्जातक, योगमाया, विवाह-पटल, बृहत्संहिता, पंचसिद्धान्तिका असे ज्योतिषशास्त्रावरील सहा ग्रंथ लिहिले. हा प्रख्यात गणिती आणि ज्योतिषी होता. हा कालपीचा राह-

णारा होता आणि आदित्यदास हे त्याच्या पित्याचे नाव होते. विक्रमादित्याच्या दरबारातील नवरत्नांमध्ये वराहमिहिराचा अंतर्भाव केला जातो; परंतु त्याच्या कालाबद्दल मतभेद आहे. 'बृहत्संहिता' हा त्याचा ग्रंथ सर्वश्रेष्ठ असा एक विशाल ज्ञानसागरच मानला जातो.

चिकित्साशास्त्रातील क्षेत्रात या काळी 'अष्टांग-संग्रह' हा वाग्भटाने लिहिलेला प्रसिद्ध ग्रंथ निर्माण झाला. तसेच नागार्जुन नावाच्या विद्वानाने संशोधिलेली 'रसचिकित्सा' नावाची पद्धती अस्तित्वात आली. धातूंच्या द्वारा रोगनिदान करण्याची रीत याने शोधून काढली. याच काळात लिहिला गेलेला 'नवनीतकम्' नावाचा आयुर्वेदावरील एक ग्रंथ तुर्कस्थानमध्ये उपलब्ध झालेला आहे.

अशा प्रकारे गुप्तकाल हा सर्व दृष्टीने भारतामधील सुवर्णकाल होता.

□



## उत्तरगुप्त

गुप्तकालाच्या उत्तरार्धातच काही नवीन राजवटी उदयाला आलेल्या होत्या. त्यांपैकी मौखरीवंश आणि उत्तरगुप्त किंवा कृष्णगुप्त वंश हे दोन राजवंश अधिक प्रसिद्ध होते. मौखरी हे बिहारमधील गया जिल्ह्यातील मूळचे निवासी असावेत. प्रारंभी मौखरी हे गुप्त साम्राज्यातील सामंत होते. तिसऱ्या शताब्दीमध्ये यांचा उदय झाला. ते वैदिक धर्माचे अनुयायी होते. त्यांनी त्रिशत्र यज्ञाचे अनुष्ठान केलेले होते. 'महासेनापती' अशी त्यांची उपाधी होती. इ. स. ५५० पर्यंत मौखरी हे सामन्त म्हणूनच राज्यकारभार पाहात होते. परंतु त्यानंतर गुप्त साम्राज्याच्या उतरत्या काळात ते स्वतंत्र बनले.

मौखरी हे सूर्यवंशी क्षत्रीय होते. स्वतंत्र बनल्यानंतर मौखरी राजांनी आपली राजधानी कान्यकुब्ज अथवा कनौज येथे स्थापन केली होती. मौखरी राजांचे अधिकांश लेख आणि नाणी या भागातच उपलब्ध

झालेले आहेत. जौनपूर, हरहा आणि असिरगढ येथील लेखांवरून त्याचप्रमाणे बाणभट्टाच्या हर्षचरित्रावरून मौखरी राजवंशात हरिवर्मा, आदित्यवर्मा, ईश्वरवर्मा, ईशानवर्मा, शर्ववर्मा, अवन्तिवर्मा आणि गृहवर्मा असे सात राजे होऊन गेले असे कळते. यांपैकी पहिल्या तीन राजांना महाराजाधिराज अशी उपाधी होती.

हरिवर्मा मौखरींच्या कान्यकुब्ज शाखेतील आद्य नरेश होता. सुमारे इ. स. ५०० च्या सुमारास याचा राज्यकाल सुरू झाला होता. याच्या राणीचे नाव भट्टारिकादेवी जयस्वामिनी असे होते. हरहा येथील लेखांत याची बरीच प्रशंसा केलेली आढळते.

हरिवर्मानंतर त्याचा पुत्र आदित्यवर्मा गादीवर आला. हा ब्राह्मणधर्माचा अभिमानी होता. याच्या काळी वैदिक मंत्रांचे उच्चारण आणि यज्ञयाग बरेच होत असत. याच्या पत्नीचे नाव हर्षगुप्ता असे होते. उत्तरगुप्त राजवंशातील सम्राट हर्षगुप्त याची ही बहीण होती. यावरून असे अनुमान निघते की आदित्यवर्माच्या काळी या दोन्ही राजवंशामध्ये मैत्रीचे व प्रेमाचे संबंध होते.

ईश्वरवर्मा हा आदित्यवर्मानंतर राज्याधिकारी बनला. जौनपूर येथील लेखात याला सिंहतुल्य राजा असे म्हटलेले आहे. याने धारा, आंध्र आणि रैवतक येथील राजांचा पराभव केलेला होता असेही या लेखात म्हटलेले आहे. याच्या पत्नीचे नाव उपगुप्ता असे होते. याने इ. स. ५५० पर्यंत राज्य केले होते. हे पहिले तीनही राजे गुप्त साम्राज्यातील सामंत–शासक होते.

ईश्वरवर्मानंतर त्याचा पुत्र ईशानवर्मा हा राज्यावर आला. त्याच्या पत्नीचे नाव लक्ष्मीवती असे होते. यावेळी गुप्त–शासन अस्तास गेलेले होते. म्हणून ईशानवर्माने आपले स्वातंत्र्य घोषित केले होते. याच्यापासून पुढे झालेल्या राजांनी महाराजाधिराज ही पदवी धारण केलेली

होती. हा एक पराक्रमी सम्राट होता. आंध्र, शुलिक, गौढ इत्यादी राजांचा त्याने पराभव करून त्यांना आपले मांडलिक बनवलेले होते. ईशानवर्माच्या काळी मौखरी आणि उत्तरगुप्त या दोन राजवंशांमध्ये संघर्षास सुरुवात झाली. कारण याच वेळी दोन्हीही सामंत हे स्वतंत्र बनलेले होते आणि त्यांच्यांत सत्तास्पर्धा सुरू झालेली होती.

ईशानवर्मानंतर त्याचा पुत्र शर्ववर्मा हा सम्राट झाला. याच्या पत्नीचे नाव इंद्रभट्टारिका असे होते. शर्ववर्मा आणि दामोदरगुप्त यांच्यांत युद्ध झाले होते. या युद्धात दामोदरगुप्त मारला गेला आणि शर्ववर्माचा विजय झाला. त्यामुळे मगधावरही मौखरींची राजवट सुरू झाली. मगध हातून गेल्यानंतर उत्तरगुप्तांच्या हातात फक्त मालव प्रदेशच उरला होता.

त्यानंतर अवन्तिवर्मा हा मौखरीवंशातील सहावा सम्राट गादीवर आला. हर्षचरितामध्ये याला राजांमध्ये 'अग्रगण्य' असे म्हटलेले आहे. याने हूण लोकांवर विजय मिळवला होता. 'मुद्राराक्षस' नाटकाचा कर्ता विशाखादत्त हा याच्या दरबारी होता. असा एक तर्क आहे.

याच्यानंतर त्याचा पुत्र गृहवर्मा हा राज्यावर आला. हर्षचरितानुसार हा सूर्याप्रमाणे तेजस्वी होता. गृहवर्मा याचा विवाह प्रभाकरवर्धनाची कन्या आणि सम्राट हर्षाची बहीण राजश्री हिच्याशी झालेला होता. या विवाहाने तत्कालीन दोन शक्तीशाली राजवंशांमध्ये स्नेहसंबंध निर्माण झालेला होता. देवगुप्त राजाने कान्यकुब्जवर आक्रमण केले आणि गृहवर्माला ठार मारले. राजश्रीला बंदीगृहात टाकले. पुढे हर्ष सम्राट झाल्यानंतर त्याने राजश्रीला वाचवले आणि कान्यकुब्जाचे राज्यही आपल्या साम्राज्यात समाविष्ट करून टाकले. हर्षाने स्थानेश्वर येथून आपली राजधानी हलविली आणि ती कान्यकुब्ज येथे आणली होती. अशा प्रकारे मौखरी वंशाचा शेवट झाला.

मौखरींच्याप्रमाणेच उत्तरगुप्त यांनीही आपले स्वतंत्र राज्य स्थापन

केले होते. हे गुप्तसाम्राज्यातील एक सामंत घराणे होते. काही काळ यांनी मगधावरही राज्य केले. परंतु पुढे यांची सत्ता माळव्यापुरतीच मर्यादित राहिली होती. या वंशामध्ये कृष्णगुप्त, हर्षगुप्त, जीवितगुप्त, दामोदरगुप्त, महासेनगुप्त, माधवगुप्त आणि आदित्यसेन असे आठ राजे होऊन गेले. कृष्णगुप्ताने या राजवंशाची स्थापना केली होती. याने हूण लोकांवर विजय मिळविला होता. याचा राज्यकाल इ. स. ४९० ते ५०५ असा मानला जातो. याच्यानंतर श्रीहर्षगुप्त हा राजा झाला. हाही मोठा शूर होता. बालादित्याने हूणांशी केलेल्या युद्धात याने भाग घेतला होता. याच्यानंतर जीवितगुप्त हा राजा झाला आणि नंतर कुमारगुप्त गादीवर आला. इ. स. ५४० ते ५६० हा कुमारगुप्ताचा राज्यकाल होता. यानेच प्रथम आपले स्वातंत्र्य घोषित केले होते. हा गुप्तसम्राटांचा सामंत राहिलेला नव्हता. या वंशातील आदित्यसेन राजाने आपल्या राज्याचा बराच विस्तार केला होता. तो लोककल्याणकारी राजा होता. त्याच्या मातेने एक मठ बांधून धार्मिकांना दिलेला होता. आदित्यसेनाने एक तलाव बांधला होता. इ. स. ६४८ ते ६७६ पर्यंत याने राज्य केले. आदित्यसेनानंतर त्याचा पुत्र देवगुप्त राजा झाला. त्याच्यानंतर विष्णुगुप्त हा राज्यावर आला. याला ‘परमभट्टारक महाराजाधिराज परमेश्वर’ अशी पदवी होती. याच्यानंतर दुसरा जीवितगुप्त हा राज्यावर आला. परंतु याच्याच कारकीर्दीमध्ये बंगालच्या राजाने हल्ला करून याचे राज्य जिंकून घेतले. हाच उत्तरगुप्त वंशातील अखेरचा राजा ठरला.

भारतीय सुवर्णयुगाचा हा अस्तकाल होता!

BVBK-0402273

म. सं. सं. ... 22603 ... 22191 ... पा-वा